बुधवार, ४ मे २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २८६
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड


## अंतरंग


...तेव्हा तुम्ही रांगत होता; आदित्य ठाकरेंना प्रत्युत्तर/२

महाराष्ट्रातील मच्छीमारांना सवलतीच्या दरात डिझेल/५

पुण्याच्या हर्षदा गरूडला वेटलिफ्टिंगमध्ये ‘सुवर्ण’/८


## पंतप्रधान मोदी डेन्मार्कमध्ये पोहचले; जोरदार स्वागत



**कोपनहेगन :** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी तीन देशांच्या युरोप दौऱ्यावर आहेत. जर्मनीनंतर दुसऱ्या दिवशी पंतप्रधान मोदी डेन्मार्कला पोहचले. विमानतळावर त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. पंतप्रधान मोदींचे स्वागत करण्यासाठी डेन्मार्कच्या पंतप्रधान मेटे फ्रेडरिक्सन स्वतः विमानतळावर आल्या होत्या. पंतप्रधान मोदी येथे भारत-नॉर्डिक शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. विमानतळावर जोरदार स्वागत केल्यानंतर पंतप्रधान मोदी डेन्मार्कची राजधानी कोपनहेगनला पोहचले. तिथे ते डेन्मार्कच्या पंतप्रधानांची स्वतंत्रपणे भेट घेणार आहेत. या बैठकीत अनेक मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. त्यानंतर दोन्ही देशांकडून संयुक्त निवेदनही जारी केले जाईल. पंतप्रधान मोदी येथे भारत-डेन्मार्क बिझनेस फोरमलाही संबोधित करतील.

# राज ठाकरेंवर गुन्हा दाखल

### औरंगाबादमधील सभेप्रकरणी पोलिसांची कारवाई

**औरंगाबाद : प्रतिनिधी**
औरंगाबादमधील सभेनंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याविरोधात आता तेथील सीटी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सभेच्या आयोजकांवरही गुन्हा दाखल झाला आहे.



### हनुमान चालिसा पठणावर ठाम

**मुंबई :** भोंग्यांबाबत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्य सरकारला दिलेल्या अल्टिमेटमचा कालावधी मंगळवारी (दि. ३) संपत असताना त्यांच्यावर औरंगाबादमधील सभेत नियमांचे उल्लंघन केल्यामुळे गुन्हा दाखल झाला. या पार्श्वभूमीवर मनसेची भूमिका काय असेल याकडे लक्ष लागून राहिले होते. या संदर्भात स्वत: राज ठाकरे यांनी पत्रक काढले आहे. यामध्ये त्यांनी ४ मे रोजी जिथे जिथे यांचे भोंगे अजान, बांग देतील तिथे तिथे आपण भोंग्यांवर हनुमान चालिसा लावावी. आता नाही, तर कधीच नाही, असे म्हणत आपण आपल्या भूमिकेवर ठाम असल्याचे स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्र दिनी अर्थात १ मे रोजी राज ठाकरे यांची जाहीर सभा औरंगाबादमध्ये झाली होती. या सभेला १६ अटी, शर्थी घालून पोलिसांनी परवानगी दिली होती. यातील काही अटींचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच प्रक्षोभक भाषण केल्याप्रकरणीदेखील राज यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाल्याचे वृत्त आहे.

या संदर्भात सिटी चौक पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक गजानान इंगळे यांनी फिर्याद नोंदवली आहे. त्यानुसार राज ठाकरे, राजीव जेवळीकर व इतरांविरोधात कलम ११६,११७,१५३ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम १३५ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

### ॲड. भगीरथ शिंदे आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते

## रयत शिक्षण संस्थेच्या मोखाडा येथील महाविद्यालयात विविध कामांचे भूमिपूजन



**मोखाडा : प्रतिनिधी**
रयत शिक्षण संस्थेच्या पालघर जिल्ह्यातील मोखाडा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्रशासकीय इमारत, बोअरवेल जलपूजन आणि बायोफ्लॉक प्लांट शेड उभारण्यात येणार आहे. या कामांचे भूमिपूजन ‘रयत’चे व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे आणि मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. २) झाले.

या कार्यक्रमास आमदार सुनील भुसारा, नगराध्यक्ष अमोल पाटील, जि. प. सदस्य प्रकाश निकम, प्राचार्य डॉ. एल. डी. भोर, प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, माजी प्राचार्य डॉ. पी. जी. पवार, डॉ. एन. आर. मढवी, शामकांत चुभळे, एल. डी. काटे, संतोष जाधव, संतोष चौथे यांच्यासह पदाधिकारी, प्राध्यापक आदी उपस्थित होते.

# पनवेल महापालिका मुख्यालयाचे भूमिपूजन; मान्यवरांची उपस्थिती



**पनवेल : प्रतिनिधी**
पनवेल महापालिका मुख्यालयाचे मंगळवारी (दि. ३) अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर मान्यवरांच्या उपस्थितीत भूमिपूजन करण्यात आले. पनवेल महापालिका हद्दीतील नवीन पनवेल सेक्टर १६, भूखंड क्रमांक ४ येथे पालिका मुख्यालयाची भव्य इमारत उभारली जाणार आहे.

भूमिपूजन समारंभास महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, महिला व बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, प्रभाग समिती सभापती संजना कदम, प्रमिला पाटील, अरुणा भगत, ॲड. वृषाली वाघमारे, नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, हरेश केणी, नगरसेविका हेमलता म्हात्रे, युवा नेते समीर कदम, ॲड. जितेंद्र वाघमारे, महापालिकेचे अधिकारी संजय कटेकर, श्री. साळुंखे आदी उपस्थित होते.

### अशी असणार रचना

मुख्यालयाच्या इमारतीचे बांधकाम तळघर, तळमजला व सहा मजले असे करण्यात येणार आहे. यातील मुख्य सभागृहाची आसनक्षमता २२४ इतकी असणार आहे. याशिवाय दोन समिती सभागृह व एक बहुद्देशीय हॉल असतील. या ठिकाणी १८३ चारचाकी वाहने व १११३ दुचाकी वाहने उभी करण्याची सुविधा असणार आहे. या मुख्यालय इमारत उभारणीचा अंदाजित खर्च ११० कोटी रुपये असून कामाचा ठेका हर्ष कन्स्ट्रक्शनला देण्यात आला आहे.

**“ आम्ही महापालिका मुख्यालय, महापौर बंगला, प्रभाग समिती कार्यालयांसह इतर मोठ्या प्रोजेक्टच्या भूमिपूजनासाठी माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व इतर नेत्यांच्या संपर्कात असून त्यांची कार्यक्रमासाठी वेळ मागितली आहे. आता कधीही पाऊस सुरू होऊ शकतो, मग पाया खोदण्याच्या कामाला पावसात अडचण येऊ नये म्हणून आज छोटेखानी कार्यक्रमात या कामाचे भूमिपूजन केले.**

**-डॉ. कविता चौतमोल, महापौर**

## निवडक

### मुंबईत ८०३ मशिदींना भोंगे लावण्याची परवानगी

**मुंबई :** येथील ८०३ मशिदींना नियमांचे पालन करून भोंगे लावण्याची परवानगी मुंबई पोलिसांनी दिली आहे. मुंबईत एकूण ११४४ मशिदी आहेत, ज्यापैकी ८०३ मशिदींना भोंग्यांसाठी परवानगी देण्यात आलीय, मात्र सायलेंट झोनमध्ये असलेल्या मशिदींवर भोंगे लावण्यास परवानगी नाही. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या भूमिकेमुळे भोंग्यांचा मुद्दा चर्चेत आला आहे.

### पुण्यात १२ लाखांचे ड्रग्ज जप्त; एकाला अटक

**पुणे :** येथील रेल्वेस्थानक परिसरात आलेल्या मुंबईतील एका अमली पदार्थ तस्कराला दहशतवादविरोधी पथकाने पकडले. त्याच्याकडून ११ लाख ८० हजार रुपयांचे ११८ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) जप्त करण्यात आले आहे. महंमद फारुख महंमद उमर टाक (वय ४३, रा. म्हाडा कॉलनी, अंधेरी, मुंबई, मूळ रा. राजस्थान) असे या तस्कराचे नाव आहे.

## थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांची ७ मे रोजी पुण्यतिथी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या वतीने कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांचा ३४वा पुण्यतिथी कार्यक्रम येत्या शनिवारी (दि. ७) सकाळी ११.३० वाजता खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) येथे आयोजित करण्यात आला आहे.



जनार्दन भगतसाहेबांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य अफाट आहे. त्यांनी अहोरात्र जनतेची सेवा केली. फक्त राजकारण नाही, तर सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. आयुष्यापेक्षा ध्येय मोठे असले पाहिजे, अशी शिकवण त्यांनी समाजात रूजवली. त्यांच्या नावाने व आशीर्वादाने सुरू झालेल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या वतीने दरवर्षी पुण्यतिथी कार्यक्रम आयोजित केला जातो. त्या अनुषंगाने शनिवारी होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर असणार आहेत.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपकार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख, कार्यकारी मंडळ सदस्य नगरसेवक अनिल भगत, प्रकाश भगत, हरिश्चंद्र पाटील, महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, कार्यकारी मंडळ सदस्य संजय भगत, वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, वसंत पाटील, संजय पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते विरंगुळा केंद्र, पथदिव्यांचे लोकार्पण

### ■ मोनिका महानवर यांच्या नगरसेवक निधीतून कळंबोलीत सुविधा

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**
भारतीय माथाडी कामगार संघटनेचे रायगड उपाध्यक्ष तथा भाजप युवा मोर्चाचे रामदास महानवर यांचा वाढदिवस विविध सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबवून साजरा झाला. यानिमित्त नगरसेविका मोनिका महानवर यांच्या नगरसेवक निधीतून उभारण्यात आलेल्या विरंगुळा केंद्र आणि पथदिव्यांचे लोकार्पण भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. १) करण्यात आले.

पनवेल महापालिकेच्या माजी महिला व बालकल्याण सभापती तथा विद्यमान नगरसेविका मोनिका महानवर यांच्या माध्यामतून कळंबोलीत विकासाची अनेक कामे केली जात आहेत. त्या अनुषंगाने त्यांच्या नगरसेवक निधीमधून सेक्टर १, २ व ३मध्ये विविध ठिकाणी पथदिवे बसवण्यात आले आहेत तसेच सेक्टर २ई येथील उद्यानात विरंगुळा केंद्र साकारण्यात आले आहे. या विकासकामांचा लोकार्पण सोहळा भाजप युवा नेते रामदास महानवर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रविवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.



या कार्यक्रमास भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, प्रभाग समिती ‘ब’च्या सभापती प्रमिला पाटील, अशोक मोटे, बबन बारगजे, रामदास महानवर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

## रायगडात अक्षय्य तृतीया, रमजान ईद उत्साहात साजरी





**अलिबाग : प्रतिनिधी**
रायगड जिल्ह्यात अक्षय्य तृतीया आणि रमजान ईदचा सण मंगळवारी (दि. ३) मोठ्या उत्साही वातावरणात साजरा झाला. दोन धर्मियांचे सण एकत्र आल्याने धार्मिक सलोखा कायम रहावा यासाठी ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

हिंदू धर्मातील साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला अक्षय्य तृतीयेचा सण मंगळवारी होता. हा मुहूर्त साधून अनेकांनी गृहप्रवेश, वास्तुशांती, नवीन व्यवसायाचा शुभारंभ केला, तर काहींनी सोने खरेदी केले. त्यामुळे सराफ पेढ्यांमध्ये गर्दी पहायला मिळाली.

दुसरीकडे सोमवारी चंद्रदर्शन झाल्यानंतर मंगळवारी मुस्लिम बांधवांनी ईद साजरी केली. त्यांनी सकाळीच मशिदीत जाऊन ईदची नमाज अदा केली. त्यानंतर एकमेकांना शुभेच्छा दिल्या. ईदनिमित्त मोहल्ल्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. घरोघरी शिरखुर्म्याचा बेत होता.

## लोकमान्य टिळकांच्या पुढाकारानेच शिवसमाधीचे काम पूर्ण

### श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचा दावा

**पुणे : प्रतिनिधी**
औरंगाबादमध्ये १ मे रोजी झालेल्या सभेत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रायगडावरची छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी लोकमान्य टिळकांनी बांधली, असे म्हटले होते. या वक्तव्यानंतर महाविकास आघाडीमधील मंत्र्यांसह, संभाजी ब्रिगेडने जोरदार टीका केली आहे. याबाबत आता श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाने लोकमान्य टिळक यांच्या पुढाकारातूनच शिवछत्रपतींच्या समाधीस्थळाचे काम पूर्ण झाल्याचा दावा मंगळवारी (दि. ३) पत्रकार परिषद घेऊन केला.

या पत्रकार परिषदेला श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचे अध्यक्ष रघुजीराजे आंग्रे, सरकार्यवाह पांडुरंग बलकवडे, माजी अध्यक्ष जगदिश कदम आणि लोकमान्य टिळक यांचे वंशज कुणाल टिळक उपस्थित होते.

लोकमान्य टिळक यांच्या पुढाकाराने १८९५ साली श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाची स्थापना झाली. या माध्यमातून अनेक कामे करण्यात आली. त्याचदरम्यान रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांची मेघडंबरीसह समाधी बांधली जावी, अशी कल्पना त्यांच्या मनामध्ये आली. त्यानुसार या कामासाठी लागणारा निधी गोळा करण्यात आला आणि या कामाला यशदेखील आले. समाधीस्थळ उभारण्यासाठी जवळपास २७ हजार रुपये लोकवर्गणीतून उभे राहिले. हे सर्व पैसे त्यांनी एका बँकेत ठेवले, पण काही महिन्यांमध्ये ही बँक दिवाळखोरीत निघाली आणि पैसे बुडाले, मात्र त्यानंतरही लोकमान्य टिळक यांनी हार न मानता पुन्हा लोकवर्गणीतून पैसे उभारले, पण याचदरम्यान लोकमान्य टिळक यांचे निधन झाले. छत्रपतींच्या समाधीसाठी १९२५ साली कामाला सुरुवात करण्यात आली आणि वर्षभरात काम पूर्ण झाले, असे सरकार्यवाह पांडुरंग बलकवडे म्हणाले.

### लोकमान्यांवरून घाणेरडे राजकारण -कुणाल टिळक

लोकमान्य टिळक यांचे छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळासाठी फार मोठे योगदान आहे. ते आपण विसरता कामा नये. ते नाकारणे म्हणजे लोकमान्य टिळकांच्या कार्याचा अपमान आहे, अशी भूमिका लोकमान्य टिळक यांचे वंशज कुणाल टिळक यांनी या वेळी मांडली तसेच लोकमान्य टिळकांवरून जे राजकारण सुरू आहे ते खूप घाणेरड्या प्रकारे सुरू असून कृपया हे थांबवले पाहिजे, असेही ते म्हणाले.

एका गोष्टीची कायम खंत आहे की, लोकमान्य टिळक यांच्या हयातीत काम पूर्ण झाले पाहिजे होते, पण ते झाले नाही, परंतु लोकमान्य टिळक यांच्या पुढाकाराने आणि प्रेरणेतून हे काम झाले आहे, असे सांगून लोकमान्य टिळक यांच्याबद्दल दोन दिवसांपासून काही विधाने करण्यात येत आहेत. याबद्दल आम्ही निषेध व्यक्त करीत असून यावर कोणीही राजकारण करू नये, असेही पांडुरंग बलकवडे म्हणाले.

लोकमान्य टिळक यांचे वंशज कुणाल टिळक म्हणाले की, लोकमान्य टिळकांच्या कार्याबद्दल सोशल मीडियावर जी काही चर्चा सुरू आहे त्यावर मी माझी भूमिका दोन दिवसांपासून मांडत आहे. राज ठाकरे यांनी औरंगाबाद येथील सभेत लोकमान्यांबद्दल जी भूमिका मांडली मी त्याला विरोध किंवा निषेधदेखील करीत नाही, पण जितेंद्र आव्हाड आणि अन्य काही इतिहासकार म्हणतात की, लोकमान्य टिळकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळासाठी एक वीटदेखील हलवली नाही. त्यावर माझा आक्षेप आहे.

# ...तेव्हा तुम्ही रांगत होता

## आदित्य ठाकरे यांना भाजपचे जोरदार प्रत्युत्तर

### बाबरी मशीदीवरून केशव उपाध्येंनी सुनावले

**मुंबई : प्रतिनिधी**

अयोध्येमधील बाबरी मशिद पडाण्याच्या श्रेयवादावरून शिवसेना आणि भाजपमध्ये शाब्दिक संघर्ष सुरू झाला आहे. विरोधी पक्षनेते दवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र दिनी घेतलेल्या बुस्टर सभेमध्ये बाबरी पाडली तेव्हा आपण तिथे होतो पण एक शिवसैनिकही त्या ठिकाणी नव्हता, असा दावा केल्यानंतर शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांच्यासह पर्यटन मंत्री आदित्य ठाकरेंनाही या वादात उडी घेत फडणवीसांची खिल्ली उडवणारे वक्तव्य केले. याच वक्तव्यानंतर आता भाजपने आदित्य ठाकरेंना खडे बोल सुनावले आहेत.



मुंबईत सोमवारी (दि. २) बेस्ट उपक्रमांतर्गत सुरू करण्यात आलेल्या कॅन्टीन उद्घाटनाच्या कार्यक्रमाला उपस्थित आदित्य ठाकरे यांनी, १८५७ च्या उठावामध्ये पण फडणवीसांचे योगदान असेल, अशी खोचक प्रतिक्रिया नोंदवली. आदित्य यांनी केलेल्या टीकेच्या पार्श्वभूमीवर भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी फेसबुकवरून आदित्य ठाकरेंवर निशाणा साधला. केशव उपाध्ये यांनी, या घटना घडल्या तेव्हा तुम्ही रांगत होता, त्यामुळे तसा तुम्हाला इतिहास माहिती असण्याची शक्यता नाही आणि एकंदरीत ज्या उथळपणे व्यक्त झालात, त्यावरून तुम्हाला या प्रकरणाचे गांभीर्य नाही हेही स्पष्ट झाले, अशी टीका केली.

**■ आत्मपरीक्षण करण्याची गरज**

***राममंदिरासाठी भाजपच्या अनेक नेत्यांनी दीर्घकाळ न्यायालयीन लढा दिला, हे तुमच्या गावीही नसेल. ज्यांनी राम मंदिराला विरोध केला, अयोध्येतील तो वादग्रस्त ढाचा पाडल्यावर विलाप केला, अयोध्येत राम मंदिर होऊच नये म्हणून परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न केला, श्रीरामांचा अवमान केला, अशा मंडळींसोबत सत्तेसाठी एकत्र आल्यानंतर आता राम आणि राम मंदिरावर बोलण्याचा आपल्याला नैतिक अधिकार किती याचेही जरा आत्मपरिक्षण करा, असा सल्लाही उपाध्ये यांनी दिला.***

# नवी मुंबईत प्रत्येक नोडमध्ये होणार इंग्रजी शाळा

## ■ महापालिकेकडून सर्वेक्षण सुरू

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई पालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये पटसंख्या वाढत आहे. यामुळे महापालिका प्रशासनाने केंद्रीय शिक्षण मंडळाच्या तसेच राज्य मंडळाच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक नोडमध्ये किमान एक इंग्रजी माध्यमांची शाळा सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. त्या दृष्टीने सर्वेक्षण सुरू आहे.

सध्या पालिकेच्या दिघा ते दिवाळे या क्षेत्रात एकूण प्राथमिक व माध्यमिक शिक्षण देणाऱ्या ७२ शाळा असून यात ४५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. नवी मुंबई पालिकेने या विद्यार्थ्यांसाठी अनेक अद्ययावत सुविधा दिलेल्या आहेत, हे पटसंख्या वाढण्याचे प्रमुख कारण आहे. वाढती विद्यार्थी संख्या आणि बदलता शैक्षणिक कल पाहाता पालिकेने कोपरखैरणे व नेरुळ येथे दोन केंद्रीय शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) शाळा सुरू केलेल्या आहेत. या शाळांनादेखील चांगला प्रतिसाद लाभत असल्याने या वर्षी या दोन शाळांमध्ये आणखी भर घालण्याचा प्रशासनाचा प्रस्ताव आहे. मराठी आणि सीबीएसई शाळांबरोबरच राज्य शिक्षण मंडळाच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांची संख्या देखील पालिका वाढविणार आहे. सध्या सहा इंग्रजी माध्यमाच्या शाळा कार्यरत आहेत. त्यात यंदा चार ते पाच शाळांची संख्या वाढवली जाणार आहे. त्यासाठी परवानगीचे प्रस्ताव तयार केले जात आहेत.



**नवी मुंबई पालिकेच्या शाळा उत्तम दर्जाच्या करण्याचा पालिकेचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. बेकायदेशीर शाळांमध्ये पालक प्रवेश घेण्यापेक्षा पालकांना अधिकृत पर्याय उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यामुळेच नवी मुंबई पालिकेने सीबीएसई व इंग्रजी माध्यमाच्या शाळांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेतला असून त्याला चांगला प्रतिसाद मिळेल अशी खात्री आहे.**

**–अभिजीत बांगर, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

# रसायनीतील अवैध हातभट्टीवर पोलिसांचा छापा

**रसायनी : प्रतिनिधी**

रसायनी परिसरातील डोंगराळ भागात अवैधरित्या सुरू असलेल्या हातभट्टीवर पोलिसांनी छापा टाकून गावठी दारू बनविण्याचे एक हजार लिटर रसायन नष्ट केले आहे.

पोलीस निरीक्षक कैलास डोंगरे यांचे मार्गदर्शनाखाली सोमवारी (दि. २) पोना. मंगेश लांगी, पोना. विशाल झावरे, पोना. नंदन पाटील, पोना. जयेश भोईर यांनी रसायनी पोलीस ठाणे हद्दीतील माडभुवन येथील डोंगराळ भागातील हातभट्टीवर छापा टाकला. त्या ठिकाणी दारु तयार करण्यासाठी लागणारे १००० लिटर रसायन पोलिसांनी हस्तगत केले आहे. हे रसायन पोलिसांनी जागच्या जागीच नष्ट केले आहे.



# सांगली कोर्टाकडून राज ठाकरे यांना अजामीनपात्र वॉरंट

**सांगली : प्रतिनिधी**



सध्या मशिदींवरील भोंग्यांविरोधातील भूमिकेमुळे चर्चेत असलेले मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याविरोधात सांगलीतील शिराळा न्यायालयाने एका जुन्या प्रकरणात अजामीनपात्र वॉरंट काढले आहे. २००८मध्ये राज यांच्या अटकेनंतर झालेल्या आंदोलनप्रकरणी हे वॉरंट काढण्यात आले आहे.

२००८मध्ये रेल्वे भरतीत स्थानिक भूमिपुत्रांना प्राधान्य द्या या मागणीसाठी केलेल्या आंदोलनात कल्याण कोर्टाच्या आदेशाने राज ठाकरेंवर अटकेची कारवाई झाली होती. या अटकेच्या निषेधार्थ शिराळा तालुक्यातील शेडगेवाडी गावात मनसे कार्यकर्त्यांनी बंद पुकारला. विनापरवाना बंद पुकारल्यामुळे शिराळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी ६ एप्रिलला वॉरंट काढण्यात आले, मात्र एक महिन्यानंतरही पोलिसांनी कारवाई केलेली नाही. त्यामुळे प्रकरण निकाली काढण्यासाठी कोर्टाने अजामीनपात्र वॉरंट पाठवले आहे.



**पनवेल : नगरसेविका दर्शना भोईर यांच्या पुढाकाराने शहरातील कृष्णाळे तलाव येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.**



**पनवेल : शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील ट्रान्सफॉर्मरला मंगळवारी अचानक आग लागली. परिसरातील नागरिकांनी तत्काळ महापालिका अग्निशमन दल व एमएसईबीशी संपर्क साधल्याने संभाव्य धोका टळला. या घटनेची माहिती मिळताच नगरसेविका रूचिता लोंढे व नगरसेवक राजू सोनी घटनास्थळी दाखल झाले होते. त्यांच्या उपस्थितीत योग्य ती कार्यवाही कारण्यात आल्याने परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.**

# दुचाकी चोरणारी टोळी गजाआड

**ठाणे : प्रतिनिधी**

कळवा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या काही दिवसांपासून दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. त्या अनुषंगाने पोलिसांनी तपास करून तिघांना अटक केली आहे. त्याचप्रमाणे त्यांच्याकडून पाच दुचाकी हस्तगत केल्या आहेत. या तिघांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना ५ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

२७ एप्रिल रोजी उभी असलेल्या बुलेटची चोरी झाल्याची घटना कळव्यात घडली होती. या प्रकरणी तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी गांभीर्याने लक्ष देत कंबर कसली आणि तपासाला सुरुवात केली. गुन्हा घडला त्या ठिकाणी एक आरोपी फोनेवर बोलताना सीसीटीव्हीमध्ये आढळून आला.

या मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी याप्रकरणी तीन आरोपींना अटक केली आहे. पोलिसांनी या प्रकरणी जुनेद अन्सारी (२६), सादिक सैय्यद (२५), शहबाजहुसेन सनवर हुसेन अन्सारी (१९) अशी या तीन अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. या तिघांची चौकशी केली असता त्यांच्याकडून पोलिसांनी दोन बुलेट आणि तीन इतर अशा एकूण पाच दुचाकी हस्तगत केल्या आहेत. त्यांच्याकडून आणखी काही गुन्ह्यांची उकल होणार असल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.



पोलिसांनी या तिघांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने ५ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.




# पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी

## पनवेल महानगरपालिका हद्दीत बुधवार, दि. ४ मे २०२२ रोजी होणारे

# कोरोना प्रतिबंधक लसीकरण

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स**

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी–४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

## ग्रामीण लसीकरण

■ भिंगारी/सागवाडी ■ घोट/कोयनावेळे ■ वळवली ■ देवीचा पाडा ■ बेलपाडा/धामोळे ■ नौपाडा

**ग्रामिण लसीकरण सत्रांत दि. १८.०४.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये वयोगट १२–१४ यांस कार्बेव्हॅक्स व १५ ते १८ वयोगटातील लाभार्थ्यांसाठी कोव्हीक्सिन लस उपलब्ध असणार आहे.**

## Precautionary Dose बाबत माहिती

- शासकीय कोविड लसीकरण केंद्रांमध्ये ६० वर्ष वरील नागरिकांना, तसेच FLW, HCW यांना दुसरा डोस घेऊन ९ महिने (३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या लाभार्थ्यांना Precautionary Dose पूर्वीप्रमाणेच उपलब्ध होणार आहे.
- दि. १०.०४.२०२२ पासून सर्व खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये १८–५९ वर्ष (Year of birth 1963-2004) वरील नागरिकांचे दुसरा डोस घेऊन ९ महिने (३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या नागरिकांना Precautionary Dose उपलब्ध होणार आहे.
- खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये लसीकरण **सशुल्क** असणार आहे.
- **१८–५९** वय नागरिकांचे Precautionary Dose हे **फक्त खाजगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये** उपलब्ध असेल.
- या लसीकरणाकरीता **कुठलेही नवीन रजिस्ट्रेशन** करण्याची आवश्यकता नाही.
- **१८–५९** वय नागरिकांचे Precautionary Dose च्या लाभार्थ्यांनी दुसऱ्या डोसचे सर्टिफिकेट/दुसरा डोस घेताना वापरलेला ID Proof व दुसऱ्या डोसकरीता दिलेला मोबाईल नंबर लसीकरण केंद्रावर सोबत घेऊन जावा.
- या लसीकरीताची शुल्क रु. २२५+GST + रु. १५० पर्यंत सर्विस शुल्क शासनाने ठरविले आहे.
- नागरिकांना लस घेताना पहिले दोन डोस ज्या लसीचे घेतले आहेत तीच लस Precautionary Dose साठी घ्यावी लागणार आहे.
- लाभार्थ्यांना कोविन अॅपवर कोणत्या खासगी लसीकरण केंद्रांवर लसीकरण सुरु आहे हे दिसणार आहे. त्याप्रमाणे कोविनवर Online Booking करुन किंवा प्रत्यक्ष लसीकरण केंद्रांवर देखील Booking करुन लस घेता येईल.


# उरण तालुक्यात महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात





**उरण : बातमीदार**

महात्मा बसवेश्वर यांची जयंती दरवर्षी अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. उरण तालुक्यातही तहसील कार्यालय, नगर परिषद, पंचायत समिती आदी शासकीय कार्यालयात महात्मा बसवेश्वर यांची ८९१ वी जयंती साजरी करण्यात आली.

तहसील कार्यालयात नायब तहसीलदार नरेश पेढवी यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्पाहार अर्पण करून वंदन केले. पंचायत समितीमध्ये गटविकास अधिकारी नीलम गाडे यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पाहार अर्पण केला तर उरण नगर परिषद कार्यालयात सहाय्यक कर्मचारी धनंजय आंबरे, संदेश पवार यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार, श्रीफळ अर्पण करून त्यांच्या कार्याचे, विचारांचे स्मरण करीत महात्मा बसवेश्वर जयंती साजरी केली. शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या पाठपुराव्यामुळे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक मनोहर धोंडे, मनिष पंधाडे, रुपेश होनराव, नारायण कंकणवाडी, शिवा बिराजदार, विनायक म्हमाने यांच्या मार्गदर्शनाखाली उरणमधील पदाधिकारी विठ्ठल ममताबादे, बालाजी हेड्डु यांच्या विशेष प्रयत्नातून महात्मा बसवेश्वर जयंती साजरी करण्यात येऊ लागली.



**पनवेल : भाजपचे केळवणे पंचायत समिती विभागीय अध्यक्ष हिरामण ठाकूर यांची आई सीताबाई ठाकूर यांचे अल्पशा आजाराने निधन झाल्याने जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत यांनी दिघाटी येथे ठाकूर परिवाराचे सांत्वन केले. या वेळी योगेश घरत, विलास ठाकूर, धर्मेंद्र भोईर, निलेश शेडगे, परमवीर शेडगे, राजन घरत, संजय पाटील उपस्थित होते.**

## गणेश मोरे

**दुखवटा**

**पनवेल** : तालुक्यातील गुळसुंदे गावातील ज्येष्ठ नागरिक गणेश कानू मोरे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. गणेश मोरे यांच्या पार्थिवावर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रेमळ स्वभाव राहिलेले गणेश मोरे यांना आदराने 'दादा' नावाने ओळखले जात होते. ते गवंडी कामात निष्णात होते. त्यांचे उत्तर कार्य गुळसुंदे येथे राहत्या घरी शुक्रवारी (दि. १३) होणार आहे.



## कोरोनाचा प्रादूर्भाव कमी झाल्याने दोन वर्षांनी

# सराफा बाजार तेजीत

### अक्षय्य तृतीयेला पनवेलमध्ये व्यावसायिकांमध्ये उत्साह

### सोने खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोरोनापासून झालेली मुक्तता आणि त्यातच सोन्याच्या किमतीत झालेली घसरणीने यामुळे मंगळवारी (दि. ३) अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर पनवेलच्या सराफा बाजारात उत्साही वातावरण पाहायला मिळाले. सकाळपासूनच पनवेल परिसरातील कामोठे, कळंबोली, खांदा कॉलनी, खारघर, नवीन पनवेल सह पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागातही सोन्या-चांदीच्या दुकानात सोने खरेदी करण्यासाठी ग्राहकांची गर्दी पाहायला मिळाली. त्यामुळे दोन वर्षांनंतर अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्ताला सोन्याची मोठी विक्री होण्याची अपेक्षा सराफ व्यावसायिकांनी व्यक्त केलेली अपेक्षा पूर्णत्वास गेल्याची भावना सोने विक्रेत्यांनी व्यक्त केली.

कोरोनामुळे दोन वर्षांच्या कालावधीनंतर सोने खरेदीचा वेग मंदावला होता. आर्थिक अडचण आणि त्यातच वाढणारे सोन्याचे भाव या प्रमुख कारणांमुळे बाजरपेठेत सोने खरेदीची लगबग दिसून येत नव्हती, मात्र कोरोनाने काढता पाय घेतल्यानंतर यंदा अक्षय तृत्तीयेनिमित्त पनवेलमध्ये सराफा बाजाराला झळाळी चढली असून यंदा सोनेखरेदीची परंपरा कायम राखल्याचे दिसून येत आहे. यंदा पारंपारिक सोने खरेदीसह ग्राहकांनी ऑनलाइन बाजारापेठेतही सोने खरेदीसाठी उत्साह दाखवला आहे. वैशाख महिन्यातील शुक्लपक्षात येणाऱ्या या सणाचा मुहूर्त हिंदू आणि जैन धर्मियांसाठी महत्वाचा मानला जातो. या दिवशी बरेचजण शुभ कार्याची सुरुवात करतात. त्यामुळे सोनेखरेदीही केली जाते. या दिवशी खरेदी केलेल्या सोन्यामुळे घरामध्ये समृद्धी येते, अशी श्रद्धा आहे.



#### नागरिकांची पनवेलच्या बाजारपेठेला पसंती

*पनवेल शहराच्या पाच किलोमीटरच्या परिसरात साधारणपणे सोन्या चांदीची जवळपास ४५० ते ५०० लहान मोठी दुकाने आहेत. यामध्ये अंदाजे पनवेलमध्ये १२५, कामोठ्यात १२५, कळंबोलीत ५० ते ६०, खांदा कॉलनीत ५० ते ६०, नवीन पनवेलमध्ये ६० ते ७० तसेच विचुंबे, देवद, सुकापूर, पाली, नेरे आदी ग्रामीण भागात ३० ते ४० दुकाने आहेत. आकर्षक डिझाइन्स, कमीत कमी मजुरीत, शुद्धतेची हमी या प्रमुख कारणांमुळे अलिबाग, पेण, कर्जत, खोपोली, खालापूर, नागोठणे, उरण परिसरातील असंख्य नागरिक पनवेलच्या बाजारपेठेत सोने खरेदीसाठी येत असतात. अक्षय्य तृतीयेनिमित्त सकाळी ग्राहकांनी सोने खरेदीसाठी बाजारपेठेत गर्दी केली होती. दुपारी १२ ते ४ या दरम्यान प्रखर उन्हामुळे खरेदीचा वेग मंदावला होता. परंतु त्यानंतर सोने खरेदीचा बंपर वेग पाहायला मिळाला.*

#### ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी विविध क्लुप्त्या

*अक्षय्य तृतीयेला शास्त्रानुसार ग्राहक सर्वाधिक सोने खरेदी करतात. यासाठी ग्राहकांना आकर्षित करण्याकरिता सोने विक्रेत्यांनी अनेक क्लुप्त्या लढवल्या होत्या. यामध्ये प्रामुख्याने विविध डिस्काऊंट ऑफर्स, कमीत कमी मजुर, वेगवेगळ्या आकर्षक डिझाइन्स, इन्स्टॉलमेंट्स स्कीम्स अशा विविध शकला विक्रेत्यांनी राबविल्या होत्या. पुढील काही दिवसांत हजार ते दीड हजारांच्या आसपास सोन्याच्या किंमतीत घट अथवा वाढ होईल असा अंदाज जाणकारांकडून व्यक्त केला जात असला तरीही अक्षय तृतीयेचा मुहूर्त साधत मंगळवारी सोने खरेदीसाठी ग्राहकांनी उत्तम प्रतिसाद दिला.*

> कोरोना टाळेबंदीतून आता मुक्तता झाल्याने बाजारपेठ पूर्वपदावर येत आहे. सराफा बाजारात सोने खरेदीसाठी दिवसेंदिवस प्रतिसाद पाहायला मिळतोय. युक्रेन- रशिया युद्धाच्या पार्श्वभूमीवर सोन्याचा भाव वाढत आहे. याचा थेट परिणाम ग्राहकांच्या खरेदीवर होतो. अक्षय तृतीयेला सोने खरेदीचा सुवर्णयोग मानला जातो. आजच्या दिवशी पनवेलच्या सराफा बाजारात सोने खरेदीसाठी अपेक्षेप्रमाणे ग्राहकांचा उत्साह पाहायला मिळाला. दोन वर्षांनंतर पूर्वीप्रमाणे सोने खरेदीला ग्राहकांचा मिळालेला प्रतिसाद समाधानकारक आहे.
>
> –राजेश बांठिया, बी. बी. बांठिया ज्वेलर्स मालक















पनवेल : रमजान ईदनिमित्त मौमीनपाडा, मुसलमान नाका, पटेल मोहल्ला तसेच परिसरातील विविध ठिकाणी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी मुस्लिम बांधवांना भेटून शुभेच्छा दिल्या. या वेळी रमजान ईदनिमित्त हलीमबाई झुलेवाली ट्रस्टतर्फे कच्ची मोहल्ला येथे शीरखुर्माचे वाटप करण्यात आले. या वेळी भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, नगरसेवक अनिल भगत, माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, चिन्मय समेळ, हनीफ कच्ची, प्रधान मंत्री ई-श्रम योजना शहर संयोजक कादिर शेख, सलमान खान, गुलाब बागवान, प्रभाग उपाध्यक्ष शावेज रिझवी, अल्पसंख्याक मोर्चा शहर अध्यक्ष निसार सय्यद यांच्यासह यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. (छाया : लक्ष्मण ठाकूर)



पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांना भाजपचे श्रीवर्धन तालुका उपाध्यक्ष अन्वर अली उंदरे आणि दनियाल अन्वर अली उंदरे यांनी रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.




पनवेल : कल्पेश भगत आणि अक्षय भगत यांच्या येवले अमृततुल्य चहाच्या शाखेचे उद्घाटन जे. डब्लू. आर. लॉजिस्टीक, एनएचबी हायवे, पाडेघर येथे झाले. या वेळी भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, नंदराज मुंगाजी, उद्योजक रतनशेठ भगत, अजय भगत, श्रीधर भगत, भरत गायकवाड, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सदस्य योगिता भगत, संतोष भगत, प्रसाद भगत, भूषण भगत, संगीत पाटील, सर्वेश भगत, अनिकेत भगत, सिद्धार्थ भगत, हरिदास म्हात्रे, प्रल्हाद म्हात्रे, रोहित म्हात्रे, सुरेश भगत, बाळकृष्ण भगत, महेश भगत, साईनाथ भगत, मयुर भगत, सुरज भगत, संदेश भगत, राजू भगत, प्रीतम भगत आदी उपस्थित होते.



पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे कार्यालयीन व्यवस्थापक अनिल कोळी यांच्या गव्हाण येथील निवासस्थानी अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर श्री सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली होती. भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी तेथे जाऊन दर्शन घेतले. या वेळी त्यांचे कोळी कुटुंबीयांकडून स्वागत करण्यात आले.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते डॉ. जे. जी. जाधव यांचा सत्कार

**पनवेल, पालघर : रामप्रहर वृत्त**

पालघर जिल्ह्यातील मोखाडा येथील रयत शिक्षण संस्थेच्या कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात माजी प्राचार्य डॉ. जे. जी. जाधव यांचा सेवापूर्ती सत्कार समारंभ सोमवारी (दि. २) झाला. या वेळी रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस मॅनेजिंग कौंन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व रयतचे चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे आणि यांच्या हस्ते डॉ. जे. जी. जाधव यांचा सत्कार करण्यात आला.





या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, डॉ. जे. जी. जाधव हे माणुसकी जपणारे, प्रेमळ आणि सर्वांना आपले जवळचे समजणारे व्यक्तीमत्व आहे. त्यांच्या या स्वभावामुळे त्यांनी रयत शिक्षण संस्थेमध्ये वेगळे स्थान निर्माण केले आहे. हजारो चांगले विद्यार्थी घडवण्याचे काम त्यांनी केले. प्राचार्य अनेक जण होतात मात्र आपल्या हृदयात स्थान निर्माण करण्याचे काम करणारे हे जे. जी. जाधव आहेत. त्यांना पुढील आयुष्य सुखा समाधानाचे जावो.

'रयत'च्या मोखाडा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. जे. जी. जाधव यांच्या सेवेचा कार्याकाळ संपुर्ण झाला. त्यानिमित्त त्यांनी आपल्या जीवनात रयत शिक्षण संस्थेसाठी केलेल्या कार्याबद्दल त्यांच्या महाविद्यालयात सेवापूर्ती गौरव समारंभ आयोजित करण्यात आला होता.

'रयत'चे व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे यांच्या अध्यतेखाली झालेल्या या सोहळ्याला आमदार सुनील भुसारा, महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, प्राचार्य डॉ. पी. जी. पवार, डॉ. एन. आर. मढवी, जिल्हा परिषद सदस्य प्रकाश निकम, मोखाड्याचे नगराध्यक्ष अमोल पाटील, शामकांत चुभळे, एल. डी. काटे, संतोष जाधव, प्राचार्य डॉ. एल. डी. भोर, संतोष चौथे आदी उपस्थित होते.





पनवेल : भाजप युवा मोर्चा शहर अध्यक्ष रोहित जगताप यांना वाढदिवसानिमित्त भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी नगरसेवक अनिल भगत व अन्य उपस्थित होते.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १९

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. आकाश या नव्याने येणाऱ्या विमान कंपनीच्या स्थापनेत कोणी पुढाकार घेतला आहे?**

*अ.* नटराजन चंद्रशेखरन *आ.* राकेश झुनझुनवाला
*इ.* रमेश दमाणी *ई.* नंदन निलकेणी

**२. एलआयसीच्या आधी भारतातील सर्वात मोठा आयपीओ कोणता होता?**

*अ.* कोल इंडिया *आ.* रिलायन्स पॉवर
*इ.* पेटीएम *ई.* एसबीआय कार्ड

**३. घर, ऑफिस किंवा १९० देशांमध्ये प्रवास करतानाही कर्मचारी काम करू शकतील, अशी परवानगी देणाऱ्या कंपनीचे नाव काय?**

*अ.* एअर बीएनबी *आ.* गुगल
*इ.* फेसबुक *ई.* मायक्रोसॉफ्ट

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# आता गोंधळ कशासाठी?

कोरोना लसीची सक्ती करता येणार नाही असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केंद्र सरकारला दिले. अनेकांना हा निकाल बुचकळ्यात टाकणारा वाटला असेल. वय वर्षे १५च्या वरील ९६ टक्के भारतीयांनी कोरोना प्रतिबंधक लसीचा किमान एक डोस आणि ८४ टक्के भारतीयांनी या लसीचे दोन्ही डोस घेतल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल आला आहे हे येथे नमूद करायला हवे. बूस्टर डोस आणि लहान मुलांसाठीचे लसीकरण यांसाठी सध्या सरकार प्रयत्नशील असताना आलेल्या या निर्देशाचे काय परिणाम संभवतील?

**भारतासारख्या अफाट लोकसंख्येच्या देशात कोरोना महामारीमुळे अतिशय भीषण परिस्थिती ओढवू शकेल अशी भीती या जागतिक संकटाला सुरुवात झाली तेव्हा जागतिक आरोग्य संघटनेपासून अनेक प्रगत देशांनीही व्यक्त केली होती, परंतु अत्यंत प्रभावीपणे उपाययोजना राबवून देशातील मोदी सरकारने कोरोना महासाथीला अटकाव केला. भारताने ज्या वेगाने कोरोना प्रतिबंधक लसीकरण साध्य केले त्याचेही जगभर कौतुक झाले, होते आहे. असे असताना लसीकरण सक्तीचे हवे अथवा नको यावर सर्वोच्च न्यायालयाने आता टीका-टिप्पणी केल्याने जनमानसात गोंधळ निर्माण होऊ शकतो असे अनेकांना वाटते. वास्तवत: आपण कोरोना प्रतिबंधक लसीकरण अनिवार्य केलेले नसून लसीकरण १०० टक्के व्हावे याकरिता प्रयत्न केले आहेत, असे स्पष्टीकरण केंद्र सरकारने यापूर्वीदेखील दिले आहे. खरेतर काहीशा सौम्य वाटून गेलेल्या तिसऱ्या लाटेतही लसीकरण न झालेल्यांचीच संख्या इस्पितळांमध्ये दाखल कोरोना रुग्णांमध्ये अधिक दिसून आली होती. दुसऱ्या लाटेदरम्यान परिस्थिती इतकी भीषण झाली होती की १६ जानेवारी २०२१ रोजी देशातील लसीकरण कार्यक्रम सुरू झाल्यानंतर लस न घेण्याचा विचार फारसा कुणी केलाच नाही. सरकारी सेवांमधील काही लोक आणि आरोग्य क्षेत्रातील कर्मचारी वगळता कुणालाही लशीची सक्ती अशी झालीच नाही. बहुसंख्य भारतीयांनी स्वेच्छेनेच कोरोना प्रतिबंधक लस टोचून घेतली. योग्य माहितीनिशी लस उपलब्ध झाल्यामुळेच कुठलीही बळजबरी न करता लोकांनी स्वत:हून रांगा लावून लसीकरणात सहभाग घेतला आणि वेगाने देशातील जास्तीत जास्त लोकांचे लसीकरण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट सरकारला गाठता आले. सध्या वय वर्षे ६०च्या खालील लोकांनी कोरोना प्रतिबंधक लसीचा बूस्टर डोस घ्यावा यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठीचे उद्दिष्टही पूर्वीप्रमाणेच लोकांना योग्य ती माहिती उपलब्ध करून देऊन, प्रतिकारशक्ती कशी कमी होते आहे याबद्दल जागरुकता निर्माण करून तसेच लसींच्या पर्यायांच्या निवडीचे स्वातंत्र्य देऊन गाठले गेले पाहिजे. लस घ्यावी अथवा न घ्यावी याचे स्वातंत्र्य जसे लोकांना आहे तसेच देशातील प्रत्येक व्यक्तीला स्वत:चे आणि सार्वजनिक आरोग्य सांभाळण्याकरिता प्रेरित करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. त्या दृष्टीने सरकारला प्रयत्नशील रहावेच लागेल. मध्यंतरी मुंबईत कोरोना प्रतिबंधक दोन्ही लसी घेतलेल्यांनाच लोकल प्रवासासाठी अनुमती दिली गेली तेव्हाही मुंबई उच्च न्यायालयाने लससक्तीच्या विरोधात ताशेरे ओढले होते, परंतु कोरोना महामारीविषयी जगभरातच तज्ज्ञांकडे अद्यापही जुजबीच माहिती उपलब्ध असल्यामुळे लसीकरण हेच तूर्तास आपल्या हातातील कोरोनाविरोधी अमोघ अस्त्र आहे हे अनेकदा अधोरेखित झाले आहे. संसर्ग आणि मृत्यूंची संख्या रोखण्यासाठी तसेच आरोग्य व्यवस्थेवरील ताणाला अटकाव करण्यासाठी सध्या तोच एक मार्ग आपल्याला उपलब्ध आहे हे या संदर्भात लक्षात घेतले गेले पाहिजे.**

# खोटे अपंग दाखले देणाऱ्यांवर कठोर कारवाईची गरज

**खबरबात**
नितीन देशमुख

महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली दिव्यांग व्यक्तींसाठी महाराष्ट्र राज्य धोरण २०१८ जाहीर केले, पण या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र मंत्रालय, स्वतंत्र अधिकारी व कर्मचारी अद्याप नेमले नाहीत. त्यामुळे वेगवेगळ्या कार्यालयात जाण्यासाठी अपंगाची ससेहोलपट होत असते. या बरोबरच खोटे अपंग दाखले देणाऱ्यावर कठोर कारवाई केल्यास निधिचा अपव्यय टाळता येईल.



महाराष्ट्र राज्यात दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यासाठी स्वतंत्र अपंग कल्याण आयुक्त पदाची निर्मिती केली, पण योजना राबविण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोडली आहे. प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने आपल्या उत्पन्नातील पाच टक्के आपल्या भागातील अपंगासाठी खर्च करावयाचे आहेत. त्याची जवाबदारी स्वतंत्र कर्मचाऱ्यावर न देता ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकावर दिली आहे. ग्रामपंचायती उत्पन्न कमी असल्यास पंचायत समिती व नंतर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाची जबाबदारी असणार आहे. याशिवाय संजय गांधी निराधार योजनेतून मदत मिळते यासाठी अपंग व्यक्तीला कार्यालयाच्या फेऱ्या मारायला लावण्यापेक्षा स्वतंत्र विभाग निर्माण केल्यास त्यांना एकाच ठिकाणी माहिती व सुविधा मिळेल.

अपंगाचे दिव्यांग अधिकार अधिनियम २०१६ नुसार २१ प्रकार आहेत. आपल्या देशात तीन टक्के अपंग असल्याचे सांगितले जाते, पण जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवाला प्रमाणे ८ ते १० टक्के आहेत. रायगड जिल्ह्यात २०१० च्या जनगणनेनुसार ५९,३०१ अपंग आहेत. अपंग प्रतिबंधांनासाठी पूर्व हस्तक्षेप हा अंध, कर्णबधिर, मतिमंद व स्वयममग्न असलेल्या ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांसाठी राबविण्यात येतो. आयुक्तालया मार्फत कर्णबधिर मुलांच्या शिक्षणासाठी व प्रशिक्षणासाठी दरवर्षी प्रती विद्यार्थी १.७५ लक्ष रक्कम खर्च होते. यामध्ये सहाय्यक उपकरणाचा ही समावेश आहे. पूर्व हस्तक्षेपामुळे काही व्यंग संपूर्णपणे दूर होऊ शकतात तर काहींची तीव्रता कमी होते. यामध्ये दिव्यांग बालकात निर्माण होणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी शक्य तितक्या लवकर करावयाच्या कृतीचा समावेश आहे. त्यामूळे दिव्यांग बालकाची वाटचाल सामान्य बालकाकडे होऊ शकते.

मूलभूत कौशल्ये जसे शारीरिक, मानसिक, संभाषण, सामाजिक, भावनिक व स्वयंसहायता शिकावीत याकडे लक्ष दिले गेले तर पूर्व हस्तक्षेपामुळे पालक व कुटुंबीयांवरील दिव्यांग बालकांमुळे निर्माण झालेला तणाव कमी होतो व त्यांचे पुनर्वसन ही होईल. दिव्यांगांना रोजगार मिळावा म्हणून साहित्य खरेदीवर जास्तीत जास्त निधी खर्च करण्यापेक्षा त्यांच्या उपचारसाठी जास्त निधी खर्च केला तर त्यांची संख्या कमी होण्यासाठी मदत होईल. शहरे वसवताना विकासकांनी दिव्यांगाचा विचार करून इमारती व उद्याने बनवली पाहिजेत. राज्यातील दिव्यांगांसाठी शासन निधी देत असते, पण दिव्यांगांचा विकास महत्त्वाचा असताना तो निधी अनेक वेळा खर्च केला जात नाही. त्यामुळे पडून राहत असल्याचे दिसून आले आहे.

अपंगांसाठी आयुक्त अपंग कल्याण यांच्याकडून अंध, कर्ण बधिर, अस्थिव्यंग व मतिमंद प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शाळांत पूर्व व शालांतोत्तर शिष्यवृत्ती, दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बिजभांडवल, कृत्रिम अवयव व साधने पुरवणे, व्यवसायासाठी अर्थ





सहाय्य, मार्गदर्शन व सल्ला केंद्रे, अपंग व अव्यंग विवाहला प्रोत्साहन देण्यासाठी अशा जोडप्याला ५० हजार रुपये दिले जातात. क्रीडा स्पर्धा, गुणवत्ता पुरस्कार, राज्य पुरस्कार व केंद्र पुरस्ककृत योजना राबविण्यात येत आहेत.

आपल्या समाजात दिव्यांग मुलांचे प्रमाण २० टक्के असल्याचा जागतिक आरोग्य संघटनेचा अहवाल आहे दिव्यांग मुले हा अपंगत्वचाच एक प्रकार आहे. पालक ते समाजापासून लपवून ठेवतात. त्यामुळे वेळेवर उपचार होत नाहीत. त्याचा परिणाम ही मुले समजाच्या मुख्य प्रवाहत येत नाहीत आणि मोठी झाल्यावर पालकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो. अशा मुलांना दातार इंस्टीट्यूटच्या माध्यमातून समाजाच्या प्रवाहात आणण्याचे काम संजय दातार यांच्या सारख्या व्यक्ती करून समाजापुढे एक आदर्श ठेवीत आहेत. रायगड जिल्ह्यात १६ अपंगांच्या शाळा व २ कार्यशाळा आहेत. त्यामध्ये प्रत्येकी ४० पेक्षा जास्त विद्यार्थी आहेत. या शाळा चालवण्याचा खर्च परवडणारा नसल्याने शासनाने कायम विनाअनुदानित शब्द काढावा, अशी मागणी या संस्था करीत आहेत.

शासनाने दिव्यांगांना सवलती दिल्याने त्याचा गैरफायदा अनेक जण घेत असल्याचे दिसून येत आहे. अनेक ठिकाणी सिव्हिल सर्जनला पैसे देऊन खोटे अपंगाचे दाखले घेण्यात आलेले आहेत आणि याच व्यक्तींना सगळ्या सवलती मिळत असल्याचे दिसून येत आहे. खरे अपंग या सवलती पासून वंचित आहेत. एस.टी मध्ये धावत येऊन गाडी पकडणार अपंग पायाने अपंग असतो. एका कार्यालयत अपंग म्हणून सवलत घेणारी व्यक्ती कार्यालयात कुबड्या घेऊन यायचा नंतर पुढे जाऊन तो दुचाकीवर पत्नीला घेऊन जात असल्याचा प्रकार उघडकीस आला. अशा प्रकाराला आळा घालण्यासाठी शासन प्रयत्न करताना दिसत नाही ही दुर्दैवाची बाब आहे. पनवेल महापालिका हद्दीत दिव्यांगांची संख्या तीन हजारचे आसपास आहे. पूर्वीच्या नगरपरीषदेने व्यापारी संकुलात दिव्यांग व्यक्तींना सन २०१५-१६ मध्ये तीन टक्के आरक्षण देऊन आठ गाळ्यांचे वाटप केले होते. महापौरांनी या गाळ्यांना भेट दिली असता नाट्यगृहाजवळील इमारत क्रमांक १ मधील व्यापारी संकुलात चार गाळ्यांपैकी एकमेव गाळयात दिव्यांग व्यवसाय करताना दिसून आले होते. त्यामुळे हे खोटे अपंगच सगळ्या योजनांचे लाभ घेत असल्याचे दिसून येत आहे. याबाबत शासनाने कडक कारवाई करणे गरजेचे आहे. खोटे दाखले देणाऱ्या सिव्हिल सर्जनवर कारवाई करणे ही गरजेचे आहे. एस.टी. महामंडळाने ही आपले आर्थिक नुकसान टाळण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करून नवीन संगणकीय ओळखपत्राचा आग्रह धरणे गरजेचे आहे. अपंगत्वाच्या टक्केवारी प्रमाणे ही ओळखपत्र वेगवेगळ्या रंगाची असून त्याच्यावर सिव्हिल सर्जन व अस्थि रोग तज्ञाची स्वाक्षरी असेल. यामुळे खोट्या ओळखपत्रांना आळा बसेल.



## बदलते तंत्रज्ञान




# आजपासून ॲमेझॉन समर सेल ऑफर्स

ई-कॉमर्स साइट ॲमेझॉन पुन्हा एकदा आपल्या ग्राहकांसाठी बम्पर सेल घेऊन येत आहे. या उन्हाळ्यात ऑफर्स आणि सवलतींचा पाऊस पडणार आहे. ॲमेझॉनने आपल्या प्लॅटफॉर्मवर समर सेलची घोषणा केली आहे. यामध्ये अनेक सवलती आणि ऑफर्सचा लाभ मिळू शकतो. हा सेल ४ मेपासून सुरू होत आहे.

ॲमेझॉन समर सेलमध्ये बम्पर डिस्काउंट असेल, पण या विशिष्ट बँकांचे क्रेडिट कार्ड किंवा डेबिट कार्ड असल्यास अधिक फायदा मिळू शकतो. या सेलमध्ये आयसीआयसीआय बँक, कोटक महिंद्रा बँक आणि आरबीएल बँकेच्या क्रेडिट कार्ड आणि डेबिट कार्डवर १०%पर्यंत अतिरिक्त बचत करू शकता येईल. यासोबतच नो कॉस्ट ईएमआयचा पर्यायही मिळेल. जर लॅपटॉप किंवा कोणतेही इलेक्ट्रॉनिक उपकरण घेण्याचा विचार असेल, तर या ऑफरचा अवश्य लाभ घ्या.

समर सेल बिजनेस सप्लाइज आणि एकत्रीत खरेदीवर उत्तम बचत ऑफर्स देतो. ॲमेझॉन बिजनेस ग्राहक जीएसटी इन्व्हॉईस सह २८% अतिरिक्त बचत करू शकतात आणि एकत्रीत खरेदीवर ४०% पर्यंतची सूट मिळवू शकतात. बिजनेस ग्राहक लॅपटॉप, हेडफोन्स, नेटवर्किंग डिव्हाईसेस, पीसी कंपोनंट्, पर्सनल आणि वर्कप्लेस सेफ्टी प्रॉडक्ट, पॉवर टूल्स, फर्निचर, लेनोवो, कॅनॉन, गोदरेज, बोट, बोश्च, आणि बऱ्याच सर्वोत्तम ब्रॅण्ड्सचे स्टेशनरी प्रॉडक्ट्स त्यांच्या कार्याच्या ठिकाणी कमीतकमी किंमतीत काम होण्यासाठी यांसारख्या श्रेणींमधून १० हजारांहून अधिक उत्पादनांवर आकर्षक डील्स मिळवू शकतात.

# जागतिक अस्थमा दिवस

जगभरात असणाऱ्या दमा किंवा अस्थमाच्या रुग्णांमध्ये आणि या विषयी संभ्रम मनात असणाऱ्यांमध्ये याबाबतची जनजागृती निर्माण करण्यासाठी म्हणून मे महिन्याचा पहिला मंगळवार जागतिक अस्थमा दिवस म्हणून साजरा केला जातो.

दमा या आजाराच्या नावातच 'दम' लागण्याची क्रिया असल्यामुळे या आजाराची लागण झालेल्या रुग्णाला थोडे काम केल्यानंतरही दम लागतो. सतत खोकला येणे आणि कफ जमा होणे यामुळे त्रासही होतो. हिवाळ्याच्या दिवसांमध्ये तर कोरडे वातावरण पाहता अनेकदा दमा नियंत्रणाबाहेर जाण्याची शक्यताही असते.

दमा किंवा अस्थमाने ग्रासलेल्यांना आपल्या खाण्यापिण्याच्या सवयींची विशेष काळजी घेण्याची आवश्यकता असते. या रुग्णांची रोगप्रतिकारक शक्ती कमी असल्यामुळे त्यांना संसर्गाचा धोका जास्त असतो. अशा रुग्णांना ॲलर्जीचा त्रासही लगेच उदभवतो. त्यासाठी खाण्यापिण्यासंबंधी त्यांनी खालील गोष्टी अवश्य ध्यानात ठेवाव्यात.....

**आर्टीफिशिअल स्वीटनर-** अस्थमा ॲण्ड एलर्जी फाऊंडेशन ऑफ अमेरिकाच्या अहवालानुसार अस्थमाच्या रुग्णांनी आर्टीफिशिअल स्वीटनरपासून दूरच राहणे उत्तम. डाएट सोडा आणि ज्यूसमध्ये याचा वापर केला जातो. यामुळे अनेकदा एलर्जीचे प्रमाणही वाढते. शिवाय साठवणीतल्या अन्नपदार्थांपासूनही अस्थमा किंवा दम्याच्या रुग्णांनी दूर राहावे.

**प्रोसेस्ड फूड-** प्रोसेस्ड फूड किंवा रासायनिक प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ खाल्ल्यामुळे दम्याच्या रुग्णांना श्वास घेण्याचा त्रास जाणवू लागतो. लहान मुलांसाठी हे पदार्थ घातक आहेत. अनेकदा किरणा मालाच्या दुकानांमध्ये असे कित्येक पदार्थ दिसतात ज्यामध्ये कृत्रिम कॅलरीचा सर्वाधिक वापर असतो, असे पदार्थ अनेकदा धोक्याची सूचना देतात.

**प्रासंगिक**

**व्हेजिटेबल ऑईल-** तेलाच्या या प्रकाराचा वापर सहसा सलाड किंवा केकच्या ड्रेसिंगसाठी केला जातो. यामध्ये असणारी रसायने शरीरात जळजळ आणि सूज वाढवतात. अस्थमाच्या रुग्णांसाठी हे अतिशय धोकादायक ठरते.

**तळलेले पदार्थ-** शक्त तितके तळलेल्या पदार्थांपासून दूर राहिल्यास अस्थमाच्या रुग्णांना याचा फायदाच होणार आहे. शिवाय अशा रुग्णांनी मीठाचेही कमीत कमी सेवन करावे.

**दुग्धजन्य पदार्थ-** दूध किंवा डेरी प्रोडक्ट्स अस्थमाला आणखी बळावतात. ज्यामुळे फुफ्फुसांमध्ये कफ तयार होतो. परिणामी या पदार्थांऐवजी अस्थमाच्या रुग्णांना ग्रीक योगर्ट खाण्याचा सल्ला दिला जातो.


**अस्थमाची लक्षणे आणि उपचार**

अस्थमाचा आजार कोणत्याही वयात होऊ शकतो. हा आजार अनुवांशिक देखील असू शकतो. सोबतच स्मोकिंग, वायू प्रदूषण, धूळ, धूर, कॉस्मेटिक आणि अगरबत्ती सारख्या सुगंधित वस्तूंपासूनदेखील अस्थमा होऊ शकतो. काही अँटी-बायोटिक औषधे, तणाव आणि सिगरेट देखील अस्थमा होण्याची संभावना वाढवते. श्वास घेण्यास समस्या, श्वास घेताना शिटीचा आवाज येणे, खोकला येणे, छातीत दुखणी ही अस्थमाची लक्षणे आहेत.


अस्थमा पुर्णपणे नाहीसा करण्यासाठी कोणताही उपचार नाही, मात्र यावर नियंत्रण मिळवता येते. अस्थमाला नियंत्रण करण्यासाठी औषधांचे नियमित सेवन करणे गरजेचे आहे. यासाठी इंहेलर्स सर्वात चांगले औषध आहे. इंहेलर्सने औषध थेट फुफ्फुसापर्यंत पोहचते, ज्यामुळे रुग्णाला आराम मिळतो.

अस्थमाच्या रुग्णाला आपल्या खाण्या-पिण्यावर विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. औषध वेळेवर घ्यावे, थंड आणि आंबट वस्तूंचे जास्त सेवन करून नये. धूळ, धूर आणि धुम्रपानापासून लांब राहावे. पाळीव प्राणी जसे की कुत्रे, मांजर यांच्या संपर्कात जास्त येऊ नये.

**(साभार : झी चोवीस तास व माझा पेपर)**



# आरोग्य प्रहर



# उन्हाळ्यात डोळ्यांची घ्या विशेष काळजी

उन्हाळ्यात आपण आपली त्वचा, केसांची काळजी घेतो, मात्र या काळात इतर महत्त्वाच्या अवयवांचीही काळजी घेण्याकडे दुर्लक्ष होऊ शकते. डोळे हा असाच महत्त्वाचा अवयव आहे. उन्हाळ्यात डोळ्यांचे आरोग्य जपणे नितांत गरजेचे आहे.

वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते उन्हाळ्यात डोळ्यांवर अतिरिक्त ताण येतो. वाढता उष्मा आपल्या डोळ्यांसाठी हानीकारक असतो. या काळात जर थेट उन्हाच्या संपर्कात आपले डोळे आले, तर उन्हातील अतिनील किरणांमुळे डोळ्यांत मोतिबिंदू किंवा नेत्रपटलाला इजा पोहचण्याची शक्यता असते. उन्हामुळे डोळ्यांना ॲलर्जी होऊन त्यांना सौम्य खाज सुटते. ते लाल होतात. सतत पाणी येते. पापण्या सुजतात. त्यात जिवाणू किंवा विषाणू संसर्ग होण्याचा धोका असतो. उन्हाच्या अतिसंपर्कामुळे डोळ्यांची जळजळ होते. अंधुक दिसण्याचा त्रास होतो. त्यामुळे अंधत्वाचा धोका उद्भवू शकतो. बुब्बुळांचे विकार होतात. प्रसंगी डोळ्यांचा कर्करोगही होऊ शकतो. उष्णता आणि प्रदूषण, हवेतील धूलिकणांमुळे डोळ्यांचे हे विकार होतात.

उन्हाळ्यात आणि इतरही काळात डोळ्यांची काळजी घेणे अत्यावश्यक आहे. वैद्यकीय तज्ज्ञ अशा प्रकारे डोळ्यांची काळजी घ्या, असे सांगतात. जर तुम्ही कॉन्टॅक्ट लेन्स वापरत असाल तर तुमचे हात धुत राहा. क्रीडा स्पर्धांसारख्या उपक्रमांत भाग घेताना डोळ्यांचे संरक्षक आवरण घाला. अतिनील किरणांपासून संरक्षक काचेचे गॉगल घालावेत. तुमची कॉन्टॅक्ट लेन्स अतिनील किरणांपासून डोळ्यांचे संरक्षण करणारी असली तरी असे गॉगल घालावेत, कारण डोळ्यांच्या उर्वरित भागांचे उष्म्यापासून ते संरक्षण करतात तसेच तुमचे डोळे कोरडे होऊ देत नाहीत.

उन्हाळ्यात निर्जलीकरण होत असते. त्यामुळे या काळात डोळ्यांच्या संरक्षणाचे उपाय न केल्यास असलेला ओलाव्याचे बाष्पीभवन होऊन डोळे कोरडे पडतात. अश्रूनिर्मितीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या काळात आवर्जून पुरेशा प्रमाणात पाणी पिणे गरजेचे असते.



क्लिक...क्लिक...!

मुरुड : दोन वर्षांनंतर कोरोनाचे निर्बंध शिथिल झाल्याने रमजान ईदनिमित्त मुस्लिम बांधवांनी राजपुरी येथे सामुदायिक नमाज पठण केले. (छाया : नितीन शेडगे)

# महाराष्ट्रातील मच्छीमार बांधवांना सवलतीच्या दरात मिळणार डिझेल

## आमदार रमेश पाटील यांच्या पाठपुराव्याला केंद्राचा हिरवा कंदील

**मुरूड : प्रतिनिधी**

कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व भाजप आमदार रमेश पाटील यांनी केंद्रीय मत्स्यव्यवसायमंत्री पुरुषोत्तम रूपाला यांची भेट घेऊन कोकण किनारपट्टीवरील मच्छीमार बांधवांना सवलतीच्या दरामध्ये डिझेल उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. ही मागणी केंद्र सरकारने मंजूर करून महाराष्ट्रातील मच्छिमार बांधवांना मोठा दिलासा दिला आहे.

शेजारील कर्नाटक, गुजरात राज्यांप्रमाणे सवलतीच्या दरामध्ये डिझेल उपलब्ध करून देण्याची केलेली मागणी केंद्र सरकारने मंजूर करून मच्छिमार बांधवांना मोठा दिलासा दिला आहे.

डिझेलचे वाढते दर परवडत नसल्याने महिन्याभरापासून मच्छीमार बांधवांच्या बोटी किनाऱ्यावरच उभ्या होत्या. त्यामुळे मच्छीमार बांधवांना सवलतीच्या दरामध्ये डिझेल उपलब्ध करून देण्यासाठी कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व भाजप आमदार रमेश पाटील यांनी राज्याचे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी यांची भेट घेतली. या वेळी त्यांनी महाराष्ट्र राज्यातील तसेच शेजारील गुजरात, कर्नाटक राज्यातील डिझेलच्या



दरामधील तफावत केंद्रीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली तसेच केंद्र सरकारने महाराष्ट्रातील मच्छिमार बांधवांना सवलतीच्या दरामध्ये डिझेल उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यावेळी केंद्रीय मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनानुसार केंद्र सरकारने कोकण किनारपट्टीवरील मच्छिमार बांधवांना सवलतीच्या दरामध्ये डिझेल उपलब्ध करून देण्याची मागणी पूर्ण केली.

रिटेल कॅटेगरी आणि बल्क पर्चेसर कॅटेगरी यामध्ये साधारण पंचवीस ते तीस रुपयांचा फरक असून तूर्तास मासेमारांना रिटेल या कॅटेगरीप्रमाणे डिझेल खरेदी करता येईल. डिझेलच्या दरवाढीचा आणि बदलत्या परिस्थितीचा फटका भविष्यात मच्छीमार बांधवांना बसू नये म्हणून पारंपारिक मासेमारांना वितरित करण्यात येणाऱ्या डिझेलची वेगळी पॉलिसी तयार करण्यासाठी ही प्रयत्न सुरू असल्याची माहिती यावेळी आमदार रमेश पाटील यांनी आमच्या प्रतिनिधीस दिली.

राज्याचे माजी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व केंद्रीय मंत्री नारायण राणे तसेच केंद्रीय मंत्री पुरुषोत्तम रूपाला यांच्या सहकार्याने केलेली मागणी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने पूर्ण करून मच्छिमार बांधवांना दिलासा दिल्याबद्दल कोकण किनारपट्टीवरील मच्छीमार बांधवांच्या वतीने केंद्र सरकारचे तसेच इतर सर्व नेत्यांचे आभार मानतो असे आमदार रमेश पाटील यांनी सांगितले.

सवलतीच्या दरात डिझेल मिळण्यासाठी केंद्रीय मंत्र्यांची भेट घेऊन आमदार रमेश पाटील यांनी ही मागणी मंजूर करून घेतली, त्याबद्दल रायगड जिल्हा मच्छिमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी समस्त कोळी समाजातर्फे आमदार रमेश पाटील यांचे आभार मानले.

# पालीतील मेणबत्ती कारखाना जळून खाक

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड पालीतील स्वागत हॉटेल शेजारी असलेल्या मेणबत्ती व सुगंधी द्रव्य निर्मिती कारखान्याला मंगळवारी भीषण आग लागली. या आगीत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र संपूर्ण कारखाना जळून खाक झाला. दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले. ही आग नेमकी कशामुळे लागली त्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही



पालीत भरवस्तीत असलेल्या मेणबत्ती व सुगंधी द्रव्य निर्मिती कारखान्याला भीषण आग लागली. पाहता पाहता या आगीचे व धुराचे लोळ सर्वत्र पसरले. एका बाजूला उन्हाचा तडखा तर दुसऱ्या बाजूला आगीचे लोळ यामुळे नागरिक भयभीत झाले. सदर आग बाजारपेठ व इतर घरांना लागू नये यासाठी ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, प्रशासन व अग्निशमन दल पूर्ण ताकतीने अथक प्रयत्न करीत होते. घटनास्थळी अग्निशमन दलाच्या तीन गाड्या पोहचल्या होत्या.

या घटनेचे वृत्त समजताच नगराध्यक्षा गीता पालरेचा, उपनगराध्यक्ष आरिफ मणियार, भाजपचे राजेश मपारा, तहसीलदार दिलीप रायन्नावर, पाली पोलीस निरीक्षक विश्वजित काइंगडे यांच्यासह नगरसेवक घटनेस्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास आगीवर नियंत्रण मिळविले.

# म्हसळा सार्वजनिक वाचनालयात महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन

**म्हसळा : प्रतिनिधी**

विश्वगुरु महात्मा बसवेश्वर यांचा जन्म अक्षय्य तृतीयेला झाला असल्याने मंगळवारी (दि. ३) म्हसळा सार्वजनिक वाचनालयात बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन वाचक वैभव गुजर यांच्या हस्ते करण्यात आले.

विश्वगुरु महात्मा बसवेश्वर हे लिंगायत समाजाचे धर्मगुरू होते. त्यांचे अनुयायी महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश या भागात मोठ्या प्रमाणात आहेत. या भागात महात्मा बसवेश्वर जयंती विशेष उत्साहाने साजरा करण्यात येते. म्हसळा सार्वजनिक वाचनालयात बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून बसवेश्वर जयंती साजरी करण्यात आली. या वेळी ग्रंथपाल उदय करडे, सायली चोगले यांच्यासह वाचनालयाचे पदाधिकारी व वाचक उपस्थित होते.




(छाया : संजय खांबेटे)

# मनसे पदाधिकाऱ्यांना रोहे पोलिसांकडून नोटीस

**धाटाव : प्रतिनिधी**

येथील पोलीस निरीक्षकांनी रोह्यातील मनसे पदाधिकाऱ्यांना नोटीसा बजावल्या आहेत. रोहे शहर व तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडवू नये, असे आवाहन या नोटीसांद्वारे मनसैनिकांना केले आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शिवाजी पार्क येथील गुढीपाडवा मेळाव्यात सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतरही प्रलंबित असलेले मशीदींवरील अनधिकृत भोंगे हटवा, अशी मागणी केली होती. तसे न झाल्यास मशीदींसमोर भोंगे लावून हनुमान चालीसा वाचा, असा आदेश मनसैनिकांना दिला होता. त्यानंतर ठाणे व औरंगाबाद येथे झालेल्या सभांमध्येही ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. औरंगाबाद येथील सभेनंतर राज्यभरातील मनसे पदाधिकारी व सक्रिय कार्यकर्त्यांना पोलिसांकडून प्रतिबंधात्मक नोटीस बजावण्यास सुरुवात झाली आहे.

रोहे पोलीस ठाण्याचे निरीक्षक प्रमोद बाबर यांनी येथील मनसे पदाधिकाऱ्यांना कलम १४९ अन्वये नोटीसा बजावल्या आहेत. शहर व तालुक्यात अबाधित असलेली शांतता कायम राहण्यासाठी कायदा व सुव्यवस्था बिघडवू नये, असे आवाहन त्यांनी या नोटीसांद्वारे मनसैनिकांना केले आहे.

# कर्जतकरांचे ग्रामदैवत श्री धापया महाराजांच्या दर्शनाला गर्दी; आज रंगणार कुस्तीचा आखाडा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतकरांचे ग्रामदैवत श्री धापया महाराज यांचा उत्सव आज मंगळवार (दि. ३) अक्षय्य तृतियेपासून सुरू झाला. दोन वर्षे कोरोनाच्या संकटामुळे उत्सव होऊ शकला नाही. त्यामुळे यंदा श्री धापया महाराजांच्या दर्शनासाठी भाविकांनी सकाळपासून गर्दी केली होती. सायंकाळी धापया महाराजांची पालखी मिरवणूक काढण्यात आली. बुधवारी सकाळी नऊ वाजल्यापासून शंभर वर्षांहून अधिक परंपरा असलेला कुस्तीचा आखाडा रंगणार आहे.



मंगळवारी पहाटे सनई वादनाने प्रसन्न वातावरण निर्माण झाले. त्यानंतर श्रींची पूजा करण्यात आली. दिलीप ठाकरे आणि महेश जुहूकर यांच्या हस्ते लघुरुद्र करण्यात आला. त्यानंतर नवस फेडण्यासाठी भाविकांची गर्दी होऊ लागली. सायंकाळी अध्यक्ष गणेश शिंदे, महेंद्र चंदन, मनोज वरसोलीकर आदींच्या मार्गदर्शनाखाली श्री धापया महाराजांची पालखी मिरवणूक काढण्यात आली. कर्जत शहरातील घराघरातील सुहासिनींनी धापया महाराजांची आरती केली. सायंकाळी जांभिवली-डोणे आदिवासी वाडीतील नारायण पवार आणि सहकारी यांच्या भजनाचे आयोजन करण्यात आले होते. चाकरमान्यांनी रात्री दर्शनासाठी गर्दी केली होती.

यानंतर बुधवारी सकाळपासून श्री धापया महाराज मंदिराच्या प्रांगणात कुस्त्यांना सुरुवात होते. लहान पैलवानांच्या कुस्त्या सकाळी रंगतात, तर दुपारनंतर मोठ्या पैलवानांच्या कुस्त्यांची सुरुवात होते. या कुस्ती आखाड्यात अनेक नामवंत कुस्तीगिर उपस्थिती दर्शवितात. मुंबई, पुणे, नाशिक, सांगली, सातारा, कोल्हापूर आदी भागातील पैलवान येथे येतात. या कुस्ती आखाड्याला शंभर वर्षांहून अधिक वर्षांची परंपरा आहे.



(छाया : महादेव सरसंबे)

**रोहे : सामाजिक समतेचे संदेश देणाऱ्या महात्मा बसवेश्वर महाराजांची जयंती मंगळवारी रोहा अष्टमी नगर परिषेदेत साजरी करण्यात आली. पालिका कार्यालयात महात्मा बसवेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. या वेळी अधिकारी संदीप शेरमकर, प्रशांत माने, लिंगायत समाजाचे नेते विनोदस्वामी जंगम, आशिषस्वामी जंगम, नगर परिषदेचे विशाल शिंदे, मदन शिवशरण, निलेश चाळके आदी उपस्थित होते.**

# रायगड जिल्ह्यात रमजान ईद उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

ईद-उल-फित्र म्हणजेच रमजान ईद मंगळवारी (दि. ३) माणगाव तालुक्यात सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली. मुस्लिम बांधवांनी मशिदीमध्ये सामुदायिक नमाज (प्रार्थना) अदा केल्यावर आलिंगन देत एकमेकांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.

माणगाव तालुक्यातील जुने माणगाव मस्जिद मोहल्ला, बाजारटेप मोहल्ला, मोर्बा, नाणोरे, लोणशी, साई, निजामपूर, दहिवली कोंड, दहिवली, तारणा, वडवली, मांजरवने, नांदवी, पुराणे, वणी, मलई कोंड, हारकोल, गोरेगाव, टेमपाले, लाखपाले, देवळी, टोळ, टोळ खुर्द आदी सर्वच गावांतून रमजान ईद उत्साहात साजरी झाली.

माणगावचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, गटनेते प्रशांत साबळे, पाणीपुरवठा सभापती राजेश मेहता, नगरसेवक दिनेश



(छाया : सलीम शेख)

रातवडकर, सुभाष पारखे, रवींद्र मोरे, माणगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीण पाटील, पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, हवालदार रावसाहेब कोळेकर, संदेश तोडणकर, विनायक पाटील, महिला पोलीस नाईक प्रीती ओमाले यांच्यासह पत्रकार बांधवांनी मुस्लिम बांधवांची भेट घेत त्यांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. काही हिंदू बांधवांनी दूरध्वनी व मोबाइलवरून संदेश पाठवून मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

गेली दोन वर्षे कोरोनाच्या संकटात शासनाने विविध सामाजिक, धार्मिक कार्यक्रमांवर निर्बंध लादले होते. मात्र यावर्षी निर्बंध उठविल्याने रमजान ईद मुस्लिम बांधवांनी मोठ्या उत्साहात साजरी केली. या वेळी तालुक्यातील मुस्लिम बांधवानी मशिदीत रमजान ईदची सामुदायिक नमाज अदा केली.

**पाली : प्रतिनिधी**

रमजान ईदनिमित्त पाली सुधागडात मंगळवारी (दि. ३) मशिदीमध्ये व घरोघरी नमाज पठण करून मुस्लिम बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या.

मुस्लिम बांधवांचे ३० दिवसांचे उपवास (रोजे) संपल्यानंतर घराजवळील मशीदमध्ये जाऊन ईदनिमित्त नमाज पठण केले जाते. मंगळवारी मुस्लिम बांधवांनी आप्तेष्ट व मित्र परिवारासह शिरखुर्मा खाण्याचा आनंद लुटला. नवीन कपडे घालून घरभर मिरविणाऱ्या लहान मुलांसाठी आज जणू आनंदोत्सवच होता.

रमजान ईदच्या दिवशी सुधागडात हिंदू, मुस्लिम, बौद्ध असे ऐक्याचे अनोखे दर्शन घडले. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) सुधागड तालुक्याच्या वतीने मुस्लिम बांधवांना पालीमध्ये मशिदीत जाऊन पुष्प देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार तसेच रिपाइं रायगड जिल्हा अध्यक्ष जगदीश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. या वेळी रिपाइं रायगड जिल्हा सचिव रवींद्रनाथ ओव्हाळ, तालुकाध्यक्ष राहुल सोनावळे, कार्याध्यक्ष भगवान शिंदे, तालुका युवक अध्यक्ष निशांत पवार तसेच तालुक्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते, उपनगराध्यक्ष आरिफ मणियार, नगरसेवक सुलतान बेनसेकर, अब्बास बेनसेकर, इम्तियाज पठाण, मन्सूरअली पानसरे आदी मुस्लिम समाज पदाधिकारी व बांधव उपस्थित होते. पोलीस निरीक्षक विश्वजीत काईनगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता.



(छाया : धम्मशील सावंत)

(छाया : अनिस मनियार)



**पेण : प्रतिनिधी**

महिनाभर रोजे ठेवल्यानंतर मंगळवारी रमजान महिन्याची सांगता ईद ए मिलादने करण्यात आली. पेण शहरातील खाटीक आळी, खान मोहल्ला, तालुक्यातील वडगाव, वडखळ आदींसह ठिकठिकाणच्या मशिदींमध्ये सामुहिक नमाज अदा करण्यात आली. ईद निमित्त नवीन कपडे, शाही जेवण, नातेवाईकांचे आगमन यामुळे सर्वत्र आनंदाचे वातावरण होते. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

पेणचे पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत काळे, पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मंगेश नेने, माजी नगरसेवक दर्शन बाफना, संतोष पाटील, युवा नेते ललित पाटील तसेच शांतता कमिटी सदस्य अनिल दरेकर, अमोल टिळक, अनंत पडवळ, नरेंद्र पाटील आदींसह सर्वपक्षीय नेत्यांनी मुस्लिम बांधवांना भेटून ईदीच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांनी सर्व समाजबांधवांनी कायदा व शांतता व सुव्यवस्थेचे पालन करीत ईद साजरी केल्याबद्दल अभिनंदन केले.


## जाहीर निविदा

सनराईज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित रजि. नं. आरजीडी/पीडब्लुएल / (टीसी) /०३-०४/२८१२/ दिनांक १४/१२/२००३ या संस्थेच्या कार्यालयाच्या छतावर पत्र्याचे शेड टाकावयाचे आहे व कार्यालयाच्या भिंतींना टाईल्स बसवायचे आहे. तरी सदर कामासाठी निविदा मागविण्यात येत आहेत तरी सदर कामामधील जाणकार कंत्राटदारांनी सदरकामाची निविदा बंद पाकिटामध्ये दिनांक ११/०५/२०२२ रोजी पर्यंत संस्थेच्या कार्यलयात जमा करावे. कामाच्या तपशिलाची सविस्तर माहिती संस्थेच्या कार्यालयाध्ये मिळेल त्यासाठी खालील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.

आपले विश्वासू

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| श्री. दिपक कडू | श्री. रविंद्र म्हात्रे | श्रीमती. रेखा म्हात्रे |
| अध्यक्ष | खजिनदार | सचिव |
| मो. नं. ८८७९९८६९२५ | मो. नं. ९९३०१४३६६४ | मो. नं. ९०८२९३७९७१ |

पत्ता :- सनराईज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित.
फायनल प्लॉट क्र. १२५ ओ-०३,
घोडके हॉस्पिटल जवळ, पनवेल ४१०२०६.

## जाहीर नोटीस

माझ्या अशिलांच्या वतीने सर्व जनतेस या नोटीसिद्वारे असे सुचित करण्यात येते कि, खालील भुखंडाचे मालक **१) श्री. केशव आदितवार नाईक , २) श्री. गोमा आदितवार नाईक , ३) सौ. भागुबाई बाबू घरत उर्फ म्हात्रे व ४) सौ. अंबुबाई बाळकृष्ण म्हात्रे, पत्ता मु. बामनडोंगरी, पो. वहाळ, ता. पनवेल, जि. रायगड.** यांच्या नावे सिडकोकडून प्रस्तावित नवी मुंबई अंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी गावठाणामधिल संपादीत करण्यात येणाऱ्या जमिनीबद्दल व त्यामधिल स्थलांतरीत होणाऱ्या निवासी वापराच्या बांधकामाबद्दल नुकसान भरपाईपोटी व पुनःस्थापनेसाठी निवासी वापराकरीता २२.५% न.मु.आं.वि.योजेने अंतर्गत **''भुखंड क्र. १००, सेक्टर २६, क्षेत्र ६२०.०० चौ.मी., नोड वहाळ (पुष्पक नगर), उलवे , ता. पनवेल, जि. रायगड''** या वर्णनाचा भुखंड वितरीत झालेला आहे. सदरच्या भुखंडामधील एकुण क्षेत्रफळ ६२० चौ.मी. मधील **१) श्री.केशव आदितवार नाईक व २) श्री.गोमा आदितवार नाईक** यांचा दोघांचा ५२० चौ. मी. इतका हिस्सा आहे व **सौ. भागुबाई बाबू घरत उर्फ म्हात्रे व सौ. अंबुबाई बाळकृष्ण म्हात्रे** या दोघींचा मिळुन १०० चौ. मी. इतका हिस्सा आहे. त्यापैकी **सौ. अंबुबाई बाळकृष्ण म्हात्रे** ह्या त्यांचा ५० चौ. मी. इतका हिस्सा त्यांचे भाऊ व बहीण **१) श्री. केशव आदितवार नाईक , २) श्री. गोमा आदितवार नाईक, ३) सौ. भागुबाई बाबू घरत उर्फ म्हात्रे** यांच्या नावे बक्षिसपत्राद्वारे करीत आहेत. सदर भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे.

**भुखंडाचे वर्णन**

| नोड | सेक्टर | भुखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| वहाळ (पुष्पकनगर) | २६ | १०० | ६२०.०० चौ. मी. पैकी सौ. अंबुबाई बाळकृष्ण म्हात्रे यांच्या हिश्श्यास येणारा ५० चौ. मी. क्षेत्र) |

तरी कोणीही व्यक्ती/व्यक्तीचे किंवा अर्थिक संस्थांचे सदर भुखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती, जसे विक्री, बोजा, दान, गहाण, सरकारी निमसरकारी, कंपनी बक्षीस भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किंवा इतर काही असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाचे आत या भुखंडाच्या संबंधित कागद पत्रासोबत माझ्या कार्यालयिन पत्यावर संपर्क साधावा. अन्यथा सदर भुखंडाच्या बक्षिसपत्र करारनाम्याद्वारे हस्तांतरण करण्याची प्रक्रीया पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती/तक्रारीचा विचार करण्यात येणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड. निरंत वासुदेव पाटील**
**कार्यालय** : तळ मजला, प्लॉट नं. बी ४०, से. २०, अष्टविनायक बिल्डींग, नेरूळ गाव, नवी मुंबई. ४००७०६. मो. ९३२४५६९८०६.

निवडक



## युईएस स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात

**उरण :** युईएस स्कूल अ‍ॅण्ड कॉलेजमध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. व्यासपीठावर युईएस संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, सिनीयर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, स्कूल अ‍ॅण्ड ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या तसेच पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक विभागातील सुपरवायझर उपस्थित होत्या. प्रथम संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर यांनी ध्वजारोहण केले. त्यानंतर माध्यमिक विभागाच्या शिक्षिकांनी महाराष्ट्र दिवसाचे महत्त्व व माहिती आपल्या मनोगतातून व्यक्त केली. उपस्थितांचे स्वागत, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच आभार प्रदर्शन यूईएस परिवारातील शिक्षकांनी केले.



## अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका सेवानिवृत्त

**पनवेल :** करंजाडे विभागातील अंगणवाडी सेविका प्रेमलता गायकवाड व पर्यवेक्षिका विणा पाटील या आपली अखंड सेवा करीत निवृत्त झाल्या. या वेळी झालेल्या छोटेखानी सेवानिवृत्ती कार्यक्रमामध्ये महिला बालविकास प्रकल्प अधिकारी चेतन गायकवाड, सरपंच व उपसरपंचांनी त्यांना पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या. अंगणवाडी सेविका प्रेमलता कैकाडी व पर्यवेक्षिका वीणा पाटील यांनी कोरोना काळात दिवस-रात्र आरोग्य विभागाला मदतीचा हात दिला आहे. वेळोवेळी नागरिकांमध्ये जनजागृती तसेच कोरोना रुग्णांना लागणारी मदतही त्यांनी केली आहे. त्याचबरोबर करंजाडे परिसरात पूरक पोषण आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी, संदर्भ सेवा, पूर्व प्राथमिक अनौपचारिक शिक्षण, पोषण आणि आरोग्य शिक्षण यासाठी परिश्रम केले असल्याने उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रेमलता गायकवाड व विणा पाटील यांनी या सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# जलवाहिन्यांना गळती लागून पाण्याचा होतोय अपव्यय!

## पनवेल-मुंब्रा महामार्गालगत प्रकार; नागरिकांमध्ये संताप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ऐन उन्हाळ्याच्या दिवसांत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जलवाहिनीला लागलेल्या गळतीमुळे पनवेल-मुंब्रा महामार्गावर मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होत आहे. या प्रकारामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त करण्यात येत असून जीर्ण जलवाहिन्या बदलण्याची मागणी होत आहे.

### कार्यवाहीची मागणी


(संग्रहित छायाचित्र)

पाण्याच्या कमतरतेमुळे शहरामध्ये सध्या आठवड्यातून एक दिवस कोरडा पाळला जात आहे तर खारघर व तळोजा वसाहतीमध्ये पाण्याची समस्या मोठी आहे, मात्र पनवेल -मुंब्रा महामार्गावर जलवाहिनीला गळती लागल्यामुळे पाणी वाया जात असल्याने संताप व्यक्त होत आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सध्या अमृत योजनेच्या माध्यमातून पनवेल परिसराला पाणीसंपन्न करण्याचे धोरण आखले आहे. याच कामाचा एक भाग म्हणून नवीन पनवेल येथील डीमार्ट ते कळंबोलीपर्यंत जलवाहिनी या दरम्यान अनेक वर्षांपासूनची जीर्ण जलवाहिनी बदलण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे.

सुमारे १६०० मीटर लांबीचा आणि ११६८ व्यास असलेली जलवाहिनी बदलण्यापूर्वी या जलवाहिनीला रंग देण्याचे काम सुरू असून हे काम मे अखेपर्यंत पूर्ण होईल. त्यानंतर जलवाहिनी बदलण्याचे काम प्रत्यक्षात सुरू होणार आहे. तोपर्यंत ही गळीत थांबवण्याची मागणी होत आहे.

**नवीन पनवेल येथील डीमार्ट ते कळंबोली सर्कल व त्यापुढील जलवाहिनी बदलण्याचे काम सुरू आहे. जलवाहिनी उपलब्ध झाली असून या जलवाहिनीला आतून व बाहेरून गंज लागून खराब होऊ नये, यासाठी रसायनमिश्रित रंग लावण्याचे काम सुरू आहे. लवकरच हे काम पूर्ण झाल्यावर जीर्ण जलवाहिनी बदलण्याचे काम हाती घेतले जाईल. हे काम अमृत योजनेअंतर्गत होत आहे.**

**-विजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**

## सीकेटी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय चर्चासत्रातून मंथन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगूकाना ठाकूर महाविद्यालयाच्या लेखा आणि वित्त विभागाच्या वतीने दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन २८ व २९ एप्रिलदरम्यान करण्यात आले होते.

या चर्चासत्राचे उद्घाटन ज. भ. प्र. संस्था सचिव डॉ. एस. टी. गडदे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील यांनी भूषविले. प्रा. सीए. डॉ. जयंत आपटे प्राचार्य घनश्यामदास सराफ महाविद्यालय, आर. ए. पोद्दार महाविद्यालय मुंबईचे प्रा. सीए. डॉ. प्रदीप कामठेकर, क्लाइव्ह वेब व्यवसाय व्यवस्थापन प्रमुख एसीसीए (यु. के) सीए डॉ. एस. बी. झावरे आणि प्रमुख धोरण एसीसीए (यु. के) गौरव कपूर, वाणिज्यप्रमुख प्रा. डॉ. एस. बी. यादव आदी उपस्थित होते.

लेखा आणि वित्तविभागप्रमुख डॉ. निलेश कोळी यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली.

प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील यांनी महाविद्यालयातील गौरवशाली परंपरांचा आढावा घेतला. प्रा. सीए डॉ. जयंत आपटे यांनी आपल्या भाषणामध्ये लेखा आणि वित्त जागतिक पैलू या विषयावर मार्गदर्शन केले. परिसंवादाच्या दुसऱ्या दिवशी क्लाइव्ह वेबचे सीए डॉ. एस. बी. झावरे आणि गौरव कपूर यांनी संवाद साधला.

हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाइसचेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांनी लेखा आणि वित्त विभागाचे कौतुक केले.

## कामोठ्यात बैलांची हत्या; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये बैलगाडीवर कलिंगडची विक्री करणाऱ्या व्यक्तीने दोन्ही बैल परिसरात चाकाला बांधून त्याच्या घरी गेला, मात्र दुसऱ्या दिवशी परतल्यानंतर दोन्ही बैलांची नशेचे इंजेक्शन देऊन हत्या केली असल्याचे समोर दिसले. बैलगाडी मालकाने कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस करीत आहेत.

तळोजा येथे राहणारा यासीन बोंबे हा गेल्या पाच वर्षांपासून कामोठे हद्दीमध्ये त्याच्या बैलगाडीतून कलिंगड विक्रीचा व्यवसाय करीतात. कलिंगड विक्रीचा व्यवसाय दिवसभर झाल्यानंतर सायंकाळी बोंबे हा हद्दीतील आयकर कार्यालयाच्या बाजूला असलेल्या मोकळ्या भूखंडावर बैलगाडी व दोन्ही बैल बांधून ठेवायचा आणि तळोजा येथे नेहमीप्रमाणे बोंबे हे दिवसभर व्यवसाय करून सायंकाळी आपल्या घरी निघून गेले. दुसऱ्या दिवशी त्याठिकाणी आला मात्र दोन्हीही बैल त्याला दिसले नाही, त्यांचा शोध घेतला असता बाजूलाच एक इंजेक्शन पडलेले दिसले, व दोन्ही बैल मृतावस्थेत दिसले.

बोंबे यांनी तत्काळ कामोठे पोलीस ठाणे गाठत या प्रकारची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळावर भेट देत माहिती घेतली. त्यानंतर प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## नगरसेवक अजय बहिरा, युवा नेते प्रतिक बहिरा यांनी दिल्या ईदनिमित्त शुभेच्छा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहराजवळील तक्का परिसरात स्थानिक नगरसेवक अजय बहिरा तसेच प्रतिक बहिरा यांनी मंगळवारी (दि. ३) मुस्लीम बांधवांच्या पवित्र अशा रमजान ईदीनिमित्त मुस्लीम बांधवांना गुलाबाचे फूल देत ईदच्या शुभेच्छा दिल्या.



या वेळी त्यांनी मुस्लीम बांधवांसह तेथे आपले कर्तव्य बजावत असलेले पोलीस अधिकारी व बांधवांना शुभेच्छा देत प्रेम आणि सद्भावना यांचे प्रतीक असलेली ही रमजान आपल्या सर्वांच्या आयुष्यात आनंद आणि हर्ष घेऊन येवो, अशी प्रार्थना केली. मुस्लीम बांधवांनी त्यांचे आभार मानले.

## भाजप नेते सय्यद अकबर यांच्याकडून ईदच्या शुभेच्छा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका भागात मोठ्या उत्साहात व शांततेत रमजान ईद साजरी झाली. नवीन पनवेल दारूल अमन मशिदीजवळ भाजप नेते सय्यद अकबर यांनी गुलाबपुष्प व रुमाल वाटप करून सर्वांचा आनंद द्विगुणित केला.



नवी मुंबई परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनावणे, खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष कोकाटे यांनी देखील सय्यद अकबर यांच्या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. ईदच्या निमित्ताने अशाप्रकारे कार्यक्रम राबवून एक चांगली परंपरा निर्माण केल्याचे शिवराज पाटील म्हणाले. हजारो मुस्लीम बांधवांनी नमाज पठण करून एकमेकांना शुभेच्छा दिल्या. सय्यद अकबर आणी पोलीस अधिकारी यांच्या नव्या पद्धतीने केलेल्या स्वागताने सर्वजण भारावून गेल्याचे दिसत होते. नवीन पनवेल दारूल अमन मशिदचे मुफ्ती हुजेफा, सेक्रेटरी हमीद इनामदार, व्यवस्थापन समितीचे सलीम खान, हरून रशीद शेख, मेहराज शेख यांनीदेखील गुलाबपुष्प व रुमाल वाटप कार्यक्रमात सहभाग नोंदवला. अमन अख्तर, साबीर शेख, गणपत वारगडा, शंकर वायदंडे, अमजद खान आदींनी कार्यक्रमाच्या आयोजनात विशेष परिश्रम घेतले.

## मिनेश गाडगीळ राज्य शासनाच्या कृषिभूषण पुरस्काराने सन्मानित

**पनवेल, रसायनी : वार्ताहर**

पनवेलसह रायगड जिल्ह्याला अभिमान वाटेल असे शेतीमधील नावीन्यपूर्ण संकल्पना राबविणारे प्रगतिशील शेतकरी मिनेश गाडगीळ यांना राज्य शासनाकडून सेंद्रिय शेतीकरिता कृषिभूषण २०१९ पुरस्काराने राज्यपाल भगतसिंह कोशारी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून नाशिक येथे झालेल्या या सोहळ्यास राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषीमंत्री दादासाहेब भुसे, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, नाशिकचे पालकमंत्री छगन भुजबळ, कृषी राज्यमंत्री विश्वजित कदम, नरहरी झिरवळ आदींसह राज्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मिनेश गाडगीळ पनवेल तालुक्यातील गुळसुंदे गावचे उच्चशिक्षित ग्रामस्थ आहेत. उच्चशिक्षित असतानाही ते शेतीतील विविध प्रयोग करू लागले आणि त्याचा परिपाक म्हणून शेतीसंशोधक व प्रगतशील शेतकरी म्हणून ते उदयास आले. शेतीतील विविध प्रकल्प त्यांनी सातत्याने राबविलेले आहेत. रासायनिक खतांच्या अतीवापरामुळे जमीन आणि मानवी आरोग्यावर दुष्परिणाम होतो. त्या अनुषंगाने सेंद्रिय प्लॅन्ट ग्रोथ प्रमोटर व काम्पोस्ट इनहॅन्सर ही मिनेश गाडगीळ यांनी संशोधित केलेली नैसर्गिक घटकांपासून बनवलेली मूलद्रव्ये आपल्याकडे उपलब्ध झाली आहेत.

वनस्पतींना आवश्यक प्रोटीन देणयाबरोबरच किड नियंत्रणाचा हे काम ही द्रव्ये करीत असल्याने शेतीमध्ये अत्यंत उपयोगी ठरली आहेत. मिनेश गाडगीळ यांचे संशोधन अत्यंत फलदायी आणि उपयुक्त ठरले आहे.

**रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे शेती नापिक होते आणि त्याचा मानवी आरोग्यावरही विपरित परिणाम होत आहे. त्याला पर्याय म्हणून सेंद्रिय प्लॅन्ट ग्रोथ प्रमोटर ही नवी संकल्पना राबवली आहे. ज्यामध्ये गोमूत्र व पाल्याच्या रसाचा वापर करून सेंद्रिय प्लॅन्ट ग्रोथ प्रमोटर व काम्पोस्ट इनहॅन्सर ही द्रव्य बनवलेली आहेत. त्याची फवारणी केल्यास सर्व न्युट्रीयंट्स पिकांना मिळतात व कीडनियंत्रणही होते आणि मिळणारे पीक हे केमिकल रेसिड्युव्हमुक्त असते.**

**-मिनेश गाडगीळ, प्रगतिशील शेतकरी व शेती संशोधक**

त्यामुळे त्यांना कृषिभूषण सेंद्रिय शेती या पुरस्काराने सपत्निक गौरविण्यात आले.

## सीकेटी महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाचे रहिवासी शिबिर उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**





जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने (एनसीसी) २३ ते २९ एप्रिल दरम्यान नेरे येथील शांतीवन येथे विशेष रहिवासी शिबिर उत्साहात झाले.

शिबिराच्या उद्घाटनाला संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे आणि नेरे सरपंच राजश्री म्हस्कर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. सुर्यकांत परकाळे यांनी विभागाच्या समाजकेंद्री उपक्रमांचा मागोवा घेतला. प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी, स्वतःच्या अंगी असणाऱ्या कलागुणांच्या विकासासाठी प्रयत्नशील राहण्याबाबत सांगितले. आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी प्रा. गणेश साठे व सूत्रसंचालन पोर्णिमा गायकवाडने केले. या वेळी गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघावसुद्धा उपस्थित होते.

शिबिरात राष्ट्रीय सेवा योजना : एक युवा चळवळ यावर प्रा. निलेश वडनेरे, रश्मी जोशी यांचे भारतीय युवक आणि पर्यावरणपूरक जीवनशैली, अल्लाउद्दीन शेख यांचे स्वातंत्र लढ्यातील वेगवेगळ्या चळवळींचा प्रभाव, डॉ. स्मिता भोईर यांनी ग्रामीण जीवन आणि समृद्ध भारत, प्रा. डॉ. विकास उबाळे यांनी नवभारत घडविण्यासाठी युवकांची भूमिका, कान, नाक, घसा तज्ज्ञ डॉ. सुजाता गवई यांचे मार्गदर्शन, सिनेमा समीक्षक डॉ. संतोष पाठारे यांनी विद्यार्थी पालक सुसंवाद यावर मार्गदर्शन केले. शिबिरादरम्यान अचानक लागलेली आग विझविण्यास स्वयंसेवक व अधिकाऱ्यांनी पुढाकार घेतल्याने शांतीवन प्रशासनाने प्रशंसापत्र दिले. या वेळी विद्यार्थ्यांनी पथनाट्य, जनजागृतीही केली.

२९ एप्रिल रोजी शिबिराचा समारोप समारंभ पमपाचे उपायुक्त गणेश शेट्ये व एनसीसीच्या रायगड उत्तर विभागाचे समन्वयक डॉ. बबन जाधव यांच्या उपस्थितीत पार पडला. सर्वोत्कृष्ट शिबिरार्थी म्हणून ओम लंके, मयुरी जाधव, सर्वोत्कृष्ट नेतृत्व म्हणून कौस्तुभ मुंडे आणि गौरी सुंबे यांच्यासह १५ जणांना गौरविण्यात आले. शिबिराच्या यशस्वीतेकरिता शारीरिक संचालक डॉ. विनोद नाईक, शिक्षकेत्तर कर्मचारी मिलिंद पाटील, संतोष घनसोळकर, स्वप्नील लिंगायत, आतिश भोईर, चंद्रकांत परकाळे, केतन पाटील यांचा सत्कार केला. आभार प्रा. आकाश पाटील व सूत्रसंचालन अभिषेक पाटील याने केले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे चेअरमन लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ.एस.टी.गडदे यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कौतुक केले.

## हजारो मुस्लीम बांधवांनी अदा केला नमाज

**उरण : वार्ताहर**

मुस्लीम बांधवांचा पवित्र सण म्हणजे रमजान ईद होय. मंगळवारी (दि. ३) रमजान ईद असल्याने सर्व मुस्लीम बांधवांनी जवळच्या मशिदीमध्ये नमाज अदा केला. शहरात असलेल्या तीन मशिदींमध्ये जाऊन सुमारे तीन हजार ३०० मुस्लीम बांधवांनी नमाज अदा केला. नमाज अदा केल्यानंतर मुस्लीम बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या.

जामा मशिदीमध्ये पहिले सत्र सकाळी ७.४५ ते ८.१५ या सत्रात सुमारे १२०० ते १५०० मुस्लीम बांधवांनी व दुसरे सत्र सकाळी ८.४५ ते ९.३०पर्यंत सुमारे ७०० ते ८०० मुस्लीम बांधवांनी नमाज अदा केला मुस्लीम बांधवांनी नमाज अदा केल्यानंतर उरण पोलीस ठाण्याच्या वतीने उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील व इतर पोलीस अधिकाऱ्यांनी मुस्लीम बांधवांना गुलाबपुष्प देऊन रमजान ईदच्या सर्वांना शुभेच्छा देण्यात आल्या. मदरसा ए मेहमुदीया येथे ७.३० ते ७.५०पर्यंत ३०० ते ३५० मुस्लीम बांधवांनी नमाज अदा केला, खाव्जा गरीब नवाज येथे पहिल्या सत्रात ५३० ते ६०० मुस्लीम बांधवांनी नमाज अदा केला तर दुसऱ्या सत्रात २५० ते ३०० मुस्लीम बांधवांनी नमाज अदा केला.



कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी व कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता सहाय्यक पोलीस आयुक्त (पोर्ट विभाग) धनाजी शिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या वेळी पोलीस आयुक्त (पोर्ट विभाग) धनाजी शिरसागर, उरण वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील, गुन्हे पोलीस निरीक्षक चव्हाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पाटील, पोलीस नाईक योगेश राठोड, उरण तालुका वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक गायकवाड व पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# खोपोलीतील शाहू महाराज सभागृहाची दुरवस्था

**खालापूर : अरुण नलावडे**

नगरपालिकेने आठ वर्षांपूर्वी बांधलेले छत्रपती शाहू महाराज सभागृह १६ कोटी रुपये खर्च करूनही भूत बंगला झाले आहे. हे नाट्यगृह दारुड्यांचा अड्डा बनला असून काही आंबट शौकीन इथे आपल्या शारीरिक गरजा भागवत आहेत तर वाटसरू, भिकाऱ्यांना हे नाट्यगृह फुकट राहण्याचं ठिकाण झाले आहे. खोपोली नगरपलिकेच्या दुर्लक्षामुळे ही वास्तू सध्या अखेरची घटका मोजत आहे.



खोपोलीच्या वैभवात भर टाकणारे छत्रपती शाहू महाराज सभागृह हे दर्जेदार स्वरुपाचे आहे, असे सांगत दस्तुरखुद्द शरद पवार यांनी उद्घाटन सोहळ्यात नगरपालिका प्रशासनाची पाठ थोपटली होती. सभागृह निर्मितीनंतर अनेक विविध कार्यक्रमांनी खोपोलीकरांचे मन रिजवले होते. अनेकांना आपल्या अभिव्यक्तीला व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ निर्माण करून दिले होते. मात्र कुठेतरी पाल चुकचुकली आणि या सभागृहाचे व्यवस्थापन नगरपालिका प्रशासनाने संगनमत करून कोणाच्या तरी हातात दिले. त्यानंतर अव्वाच्यासव्वा भाडे आकारणी सुरू झाली. सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकिय व्यासपीठाला धंद्याचे स्वरूप आल्याने खोपोलीकर त्या सभागृहात पाऊल ठेवण्यासाठी कचरू लागले. त्यातच कोरोनाचे वैश्विक संकट घोंगावू लागले आणि सभागृहाने मग मान टाकली.

खोपोली नगरपालिका प्रशासन इतर विकासकामांवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च करत आहे. मात्र छत्रपती शाहू महाराज सभागृह दुरुस्त करण्यास निधी नसल्याचे सांगत आहे. या विषयावर चर्चा झाल्याने येथे पहारा करण्यास एक कर्मचारी तैनात करण्यात आला आहे. मात्र हे उशिरा सुचलेलं शहाणपण असल्याची चर्चा आहे.खोपोलीच्या गेल्या काही वर्षात सांस्कृतिक अधिष्ठनात मानाचे स्थान निर्माण करण्यात यशस्वी झालेल्या छत्रपती शाहू महाराज सभागृह आता कात कधी टाकणार हा प्रश्न खोपोलीकरांसमोर उभा राहिला आहे.

छत्रपती शाहू महाराज सभागृह दुरुस्तीच्या बाबतीत होत असलेल्या दुर्लक्षाबद्दल खोपोलीतील ज्येष्ठ रंगकर्मी उल्हासराव देशमुख, नाट्यरसिक प्रवीण शिरसागर, संतोष कोळपकर, प्रवीण पुरी, निशा दळवी, प्रकाश राजोपाध्ये, नितीन भावे, गुरुनाथ साठेलकर असे अनेकजण खंत व्यक्त करत आहेत. काल-परवा खोपोली उपनगरात रस्ता नाही म्हणून नागरिक उपोषणास बसले होते. त्या आंदोलनाची लागलीच दखल घेऊन नगरपालिकेचे मुख्याधिकारी आणि प्रशासनाने लागोलाग रस्ता निर्मितीसाठी पाऊल उचलले. तशाच स्वरूपाचे उपोषण कलारसिकांनी केल्यानंतर सभागृह सुरू झाल्यास आश्चर्य वाटणार नाही.

छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या नावाने असलेल्या स्मारकांचे पावित्र्य जपणे, हे राष्ट्रीय कर्तव्य आहे, याचे भान ठेवल्यास छत्रपती शाहूमहाराज सभागृहाचे दरवाजे कार्यक्रमासाठी उघडतील आणि पडदा उघडण्यासाठी घंटा वाजेल, याची खोपोलीकर वाट बघत आहेत.

**छत्रपती शाहू महाराज सभागृहाच्या दुरुस्तीसाठी मोठा निधी लागणार असून, तसा प्रस्ताव तयार करण्याचे आदेश दिले आहेत.**

**–अनुप दुरे, मुख्याधिकारी, खोपोली नगरपालिका**

## माथेरानमधील महिलेचा मूल होत नाही म्हणून छळ

### पतीचा डॉक्टर तरुणीबरोबर दुसरा विवाह

**कर्जत : बातमीदार**

माथेरान येथील तरुणीचा २०१५मध्ये सोलापूर येथील तरुणांबरोबर विवाह झाला होता. मात्र लग्नाला सहा वर्षे झाली तरी मुल होत नाही म्हणून विवाहितेचा गेली पाच वर्षे छळ सुरु होता. त्यानंतर सहा लाख रुपयांची मागणी करून ते पैसे आणण्यासाठी सोलापूर येथून माथेरानला आणून सोडणाऱ्या सासरच्या मंडळीवर माथेरान पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

माथेरान कोतवाल नगर येथे राहणाऱ्या प्रिती कुणाल घोडके यांचे २०१५ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील सूर्यनगर येथील कुणाल कमलनाथ घोडके याच्यांबरोबर लग्न झाले होते. लग्नानंतर मुलं होत नाही म्हणून सासरची मंडळी प्रितीचा शारीरिक आणि मानसिक छळ करीत होती. पती कुणाल, सासू कांचन घोडके, सासरे कमलनाथ घोडके, नणंद कांता प्रशांत गाढवे, प्रशांत विठ्ठल गाढवे यांच्याकडून सहा वर्षे सतत छळ सुरु होता. त्यानंतर माहेरून सहा लाख रुपये आणवेत, यासाठी प्रितीचा छळ सुरु झाला. याच काळात कुणालने डॉ. वैशाली देशमुख यांच्यासोबत दुसरे लग्न केले. त्यानंतर सासरच्या मंडळीने प्रिती माहेरी माथेरान येथे पाठवून दिले. मात्र लॉकडाऊनमध्ये व्यवसाय ठप्प झाल्यामुळे प्रितीच्या माहेरच्या मंडळीना प्रयत्न करूनदेखील पैशाची जुळवाजुळव करणे शक्य होत नव्हते व सासरची मंडळी सोलापूर येथे नेण्यास तयार नव्हती. अखेर प्रिती कुणाल घोडके (वय ३१) यांनी माथेरान पोलीस ठाण्यात पतीसह सासू, सासरे, नणंद, तिचा पती आणि नवऱ्याची दुसरी पत्नी डॉ. वैशाली या सहा जणांविरूध्द तक्रार दाखल केली. पोलीस उपनिरीक्षक केतन सांगळे अधिक तपास करीत आहेत.

## कर्जतचे हनुमंत रवणे गुणवंत तांत्रिक कामगार पुरस्काराने सन्मानित

**कर्जत : प्रतिनिधी**

महावितरणच्या कर्जत उपविभागाच्या दहिवली शाखेत कार्यरत असणारे हनुमंत गोविंद रवणे (रा. तिघर, ता. कर्जत) यांना रविवारी (दि. १) गुणवंत तांत्रिक कामगार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.


(छाया : विजय मांडे)

जागतिक कामगार दिन व महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून महावितरणच्या भांडूप नागरी परिमंडळांच्यावतीने रविवारी गुणवंत तांत्रिक कामगार सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये शाखा दहिवली -१ मधील वरिष्ठ तंत्रज्ञ हनुमंत गोविंद रवणे यांना प्रशस्तीपत्र, मानचिन्ह देऊन मुख्य अभियंता सुरेश गणेशकर यांनी सन्मानित केले. या वेळी महावितरणच्या भांडूप नागरी परिमंडळातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## लिंगायत वधू-वर पालक परिचय मेळावा

**रोहे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र वीरशैव सभा ठाणे जिल्हा समिती व वीरशैव लिंगायत सेवा संस्था ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने डोबिंवली येथील सर्वेश मंगल कार्यालयात रविवारी (दि. ८) सकाळी १० वाजता वीरशैव लिंगायत समाजातील सर्व इच्छुक वधू-वर पालक परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

अंबरनाथच्या नगराध्यक्षा मनिषा अरविंद वाळेकर, अनंत हलवाई प्रा.ली. चे संचालक राजूशेठ विठ्ठल गवळी, अध्यक्ष शांतकुमार लच्याने, कार्याध्यक्ष प्रदिप निलाखे, सरचिटणीस सिध्देश्वर लिगाडे, सल्लागार चंद्रकांत मनियाळ उपाध्यक्ष बी. डी. अळ्ळगी, शिवानंद सकपाळ, प्रमिला वि लंबे आदी मान्यवर या मेळाव्यास उपस्थित राहणार आहेत.

इच्छुकांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा तसेच या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी दादा पाटील (डोंबिवली), राजश्री मेणकुदळे (ठाणे) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन समिती उपाध्यक्ष बसवंतराय अळ्ळगी यांनी केली आहे.

## वीटभट्टीवरील मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील दामत येथील दहा वीटभट्ट्यांवर काम करणाऱ्या स्थलांतरित आदिवासींच्या मुलांसाठी शाळा चालविली जाते. या शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना जय मल्हार रिक्षा चालक-मालक सेवाभावी संस्थेने शैक्षणिक साहित्य आणि खाऊचे वाटप केले.

यावेळी रिक्षा संघटनेचे सल्लागार श्रावण जाधव, स्टॅन्ड प्रमुख भगवान जामघरे, तसेच अनिल मते, प्रदीप गवळी, अंकुश बाबरे आदींसह या शाळेच्या शिक्षिका भाविका जामघरे उपस्थित होत्या.

## आदिवासी भाषेतील 'शिवकथा'चे प्रकाशन

**कर्जत : बातमीदार**

पुणे येथील लेखक नरेंद्र पेंडसे यांच्या आदिवासी समाजाच्या चालीरीती रूढी परंपरांवर आधारित शिवकथा या पुस्तकाचे अशोक चांगो भगत या आदिवासी तरुणाने ठाकरी भाषेत भाषांतर केले आहे. या भाषांतरीत केलेल्या पुस्तकाचे कर्जत तालुक्यातील आनंदवाडी येथे प्रकाशन करण्यात आले.



कर्जत तालुका आदिवासी संघटना अध्यक्ष भरत शिद, शिवकथा पुस्तकांचे मूळ लेखक नरेंद्र पेंडसे, युवकनेते भास्कर देसले, मनोज भोईर, वसंत केवारी, संतोष पुजारी, तंटामुक्त गाव अध्यक्ष पुंडलीक उघडा, पोलीस पाटील रघुनाथ भला, मनोहर भगत, माजी सरपंच बाळू शिद, संतोष आगिवले, स्वप्नील वाघमारे, सुरेश शिंगवा, दत्ता पुंजारा, रमेश दरवडा, आंबो पुंजारा, पांडुरंग पुंजारा, रघुनाथ देशमुख, दौलत आवटी यांच्यासह आंनदवाडी ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ, प्रगटेश्वर मित्र मंडळ यांचे पदाधिकारी व सदस्य या ठाकरी भाषेतील पहिल्या पुस्तकांच्या प्रकाशन सोहळ्याला उपस्थितीत होते.

## महाड हिरवळ महाविद्यालयात दीक्षांत समारंभ

**माणगाव : प्रतिनिधी**

सध्याच्या जगात वेळ व संधीला कष्टाची जोड देऊन विद्यार्थ्यांनी आपला विकास साधावा, असे आवाहन संजय घवघवे यांनी शनिवारी (दि. ३०) महाड येथे केले.



(छाया : सलीम शेख)

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या महाड येथील कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी येथे शनिवारी सकाळी विद्यार्थ्यांच्या दीक्षांत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यात संजय घवघवे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. ट्रस्टच्या संचालिका सोनाली धारिया, प्रमुख सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हिरवळ संस्थेचे अध्यक्ष किशोर धारिया यांनी पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

मान्यवरांच्या हस्ते सर्व पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना पदवीदान करण्यात आले. या समारंभाला ट्रस्टच्या सेक्रेटरी संतोष बुटाला, ट्रस्टच्या गुरुकुल ॲकॅडमीच्या मुख्याध्यापिका वासंती रजाप्पण यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## चौल येथे एकपात्री अभिनय स्पर्धा

### मिरा पाटील, आर्या मोरे यांनी पटकावला प्रथम क्रमांक

**रेवदंडा : प्रतिनिधी**

ज्येष्ठ अभिनेत्री आशालता वाबगावकर यांच्या स्मरणार्थ चौल (ता. अलिबाग) येथील मोरया कला ॲकडमीने आयोजीत केलेल्या एकपात्री अभिनय स्पर्धेच्या मोठ्या गटात मिरा निनाद पाटील हिने तर छोट्या गटात आर्या गणेश मोरे हिने प्रथम क्रमांक पटकावला.

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून मोरया कला ॲकडमीने रविवारी (दि. १) ज्येष्ठ अभिनेत्री आशालता वाबगावकर यांच्या स्मरणार्थ चौल भाटगल्ली येथे एकपात्री अभिनय स्पर्धा आयोजित केली होती. ही स्पर्धा दोन गटात घेण्यात आली. एकूण ३४ स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. ज्येष्ठ अभिनेते व दिग्दर्शक सतिश पुळेकर, श्रध्दा पुळेकर व निलेश खोत यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धेचे सूत्रसंचालन अनिल म्हात्रे यांनी केले. स्व. आशालता वाबगावकर यांची भाची मृगजाताई, मनिष अंसुरकर, राजिपचे माजी विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे, निवास केळकर, सुधाकर मेस्त्री, निलेश खोत यांच्यासह रसिक प्रेक्षकांनी या स्पर्धेस मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्पर्धकांना प्रोत्साहन दिले.

विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, व चषक प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश कवळे यांनी केले. या वेळी राजिप विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे, अभिनेते व दिग्दर्शक सतिश पुळेकर यांची समयोचित भाषणे झाली.

**स्पर्धेचा निकाल**

**मोठा गट –**
**प्रथम :** मिरा निनाद पाटील,
**व्दितीय :** स्नेहल महेंद्र गुरव,
**तृतीय :** अभिषेक प्रमोद पाटील
**उत्तेजनार्थ :** सुधीर सावंत

**छोटा गट –**
**प्रथम :** आर्या गणेश मोरे,
**व्दितीय :** आर्या विनोद नाईक,
**तृतीय :** कौस्तुभ पाटील,
**उत्तेजनार्थ :** ओवी आगलावे, नव्या नाईक, अनन्या परभाळे


(छाया : महेंद्र खैरे)

## वैश्यवाणी समाजाच्या अध्यक्षपदी सुधीर मांडवकर


(छाया : महेश शिंदे)

**महाड : प्रतिनिधी**

वैश्यवाणी समाज सेवाभावी संस्थेच्या महाड-पोलादपूर तालुका अध्यक्षपदी सुधीर मांडवकर यांची तर उपाध्यक्षपदी अनिल ताठरे, नंदकुमार खातू, प्रज्ञा डोळस, नंदकिशोर थरवळ, भूषण देवळेकर, अमर जैतपाळ यांची निवड करण्यात आली.

संस्थेची सर्वसाधारण सभा वैश्यवाणी समाजाच्या महाड येथील हनुमान मंदिरात झाली. त्यात सुरुवातीला समाजातील निधन पावलेल्या बंधु - भगिनींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सुधीर मांडवकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. दिनानाथ (दादा) महाकाळ यांनी आजारपणामुळे अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यामुळे सभेमध्ये पुढील पाच वर्षांसाठी सुधीर मांडवकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या सभेत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. त्यात किरण वायकूळ (सचिव), राजश्री खेडेकर (सहसचिव) आणि संतोष डाकवे (खजिनदार) यांचा समावेश आहे.

संस्थेचे संस्थापक प्रसिद्ध व्यापारी संतोष (आप्पा) थरवळ, शहर अध्यक्ष अशोक वारंगे, सुधाकर गांगण, संगिता थरवळ, उदय गांगण, प्रविण डोळस, माजी सभापती संजय चिखले, नवीनचंद्र थरवळ, विनायक वाडकर, समीर पाथरे, नंदकुमार सातपुते, सुभाष खातू, राधेश्वरी थरवळ, राजा शेट्ये, राजेंद्र जैतपाळ, सुवर्णा थरवळ, राहुल थरवळ, अरुण गांगण, सुरेंद्र खातू, सोनाली खातू, सुनिल गांगण, परशुराम जैतपाळ यांच्यासह बहुसंख्य समाज बंधु-भगिनी या सभेला उपस्थित होते.

## माणगावात नाचणी पीक प्रात्यक्षिके

**क्षेत्र वाढीसाठी तालुका कृषी विभागाचा उपक्रम**



**माणगाव : प्रतिनिधी**

चालू खरीप हंगामात भाताबरोबरच नाचणी पिकाखालील क्षेत्र वाढण्यासाठी माणगाव कृषी विभागामार्फत पाचशे हेक्टर क्षेत्रावर पीक प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले असून शेतकऱ्यांना मोफत बियाणे उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

मानवी शरीरासाठी अत्यंत पौष्टिक समजलं जाणार कॅल्शियम बरोबरीने लोह, नायसिन, थायमिन, रिबोफ्लेविन ही महत्त्वाची पोषकद्रव्ये असलेले नाचणी पीक आहे. कॅल्शियमच्या विपुल प्रमाणामुळे खेळाडू, कष्टाचे काम करणारे, वाढती मुले यांना नाचणीपासून बनवलेले पदार्थ खाण्याचा सल्ला डॉक्टर, आहार तज्ज्ञ देत आहेत. मधुमेह, अशक्त व आजारी माणसांना नाचणीचा आहार उपयुक्त व गुणकारी मानला जातो. यामुळे रक्तातील कोलेस्टेटरॉल कमी होते तसेच मधूमेहाचे प्रमाण कमी होते. नाचणी हे पीक हलक्या व वरकस जमिनीत घेतले जाते. कोकणात मोठ्या प्रमाणावर या पिकाची लागवड होते.

राज्य शासन कृषी विभाग मार्फत सन २०२२-२३च्या खरीप हंगामात राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियानाअंतर्गत नाचणी पीक प्रात्यक्षिके दाखविली जाणार आहेत. माणगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना फुले नाचणी या वाणाचे बियाणे उपलब्ध केले जाणार असून, प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून शेतकऱ्याना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बीज प्रक्रिया, टोकन पद्धतीने लागवड, खताचा वापर, कीड रोग व्यवस्थापन इत्यादी बाबत सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच काढणी पश्चात तंत्रज्ञानचा अवलंब करून नाचणीपासून पापड, नूडलस, आंबील, इडली, बिस्किटे, नाचणी सत्व इत्यादि पदार्थ बनविणे याचे प्रशिक्षण व प्रात्यक्षिक दाखविले जाणार आहे.

फुले नाचणी हे वाण लष्करी अळी व पाने खाणारी अळी या किडींना प्रतिकारक्षम असून ११५ ते १२५ दिवसांमध्ये पिक काढणीसाठी पूर्ण तयार होते. तसेच खरीप हंगामाकरिता नाविन्यपूर्ण कार्यक्रमांतर्गत रत्नागिरी ७ या वाणाचे भाता बियाणे उपलब्ध केले जाणार आहे, हे वाण लाल रंगाचे असून तांदूळ आखूड व जाड दाणा असतो, तो १२२ ते १२५ दिवसात काढणीसाठी तयार होतो.

या कृषि प्रत्यक्षिकांचा लाभ घेण्यासाठी प्राधान्याने आदिवासी शेतकरी, महिला शेतकरी, शेतकरी उत्पादक गट, यांची निवड केली जाणार आहे, त्यासाठी तालुका कृषि अधिकारी कार्यालयात किंवा कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक यांच्याकडे १० मे पूर्वी नाव नोंदणी करावी, असे आवाहन माणगाव तालुका कृषी अधिकारी आर. डी. पवार यांनी केले आहे.

आयपीएलचा रनसंग्राम | आजचा सामना | राजस्थान वि. चेन्नई सायं. ७.३० वा., पुणे

# कोलकाताचा राजस्थानवर विजय



**पुणे : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये सोमवारी झालेल्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स संघाने राजस्थान रॉयल्सवर सात गडी राखून दणदणीत विजय मिळवला. राजस्थानने कोलकातासमोर विजयासाठी १५३ धावांचे लक्ष्य ठेवले होते. कोलकाताला रोखण्यासाठी राजस्थानने शेवटपर्यंत प्रयत्न केला, मात्र शेवटी कोलकाताच्या नितीश राणा आणि रिंकू सिंग या जोडीने जबाबदारी स्वीकारत संघाला विजय मिळवून दिला.

राजस्थानने विजयासाठी दिलेले आव्हान पार करताना कोलकाताला कसरत करावी लागली. सलामीला आलेले बाबा इंद्रजित (१५) आणि अरॉन फिंच (२) स्वस्तात बाद झाले. त्यानंतर मात्र श्रेयस अय्यरने कर्णधार म्हणून आपली जबाबदारी बजावली. संघावर दबाव असताना अय्यरने ३२ चेंडूमध्ये ३४ धावा केल्या. अय्यर बाद झाल्यानंतर नितीश राणा आणि रिंकू सिंग ही जोडी संघाला विजयापर्यंत घेऊन गेली. राणाने ४८, तर रिंगू सिंगने ४२ धावा केल्या.

तत्पूर्वी नाणेफेक जिंकून कोलकाता संघाने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या राजस्थानची सुरुवात खराब झाली. तिसऱ्याच षटकात सलामीला आलेला देवदत्त पडिक्कल अवघ्या दोन धावा करून बाद झाला. त्यानंतर जोस बटलरदेखील मोठी खेळी करू शकला नाही. त्याने २२ धावा केल्या.

सलामीचे दोन्ही फलंदाज स्वस्तात बाद झाल्यानंतर दुसऱ्या विकेटसाठी आलेल्या संजू सॅमसनने अर्धशतकी खेळी केली. त्याने ४९ चेंडूमध्ये ५४ धावा करीत राजस्थानला सावरले. सॅमसननंतर मात्र मधल्या फळीतील फलंदाज मोठी कामगिरी करू शकले नाहीत. करुण नायर (१३), रियान पराग (१९) स्वस्तात बाद झाले, तर शिमरॉन हेटमायर (२७) आणि आर अश्विन (६) या जोडीने नाबाद राहत शेवटपर्यंत धावा चोरण्याचा प्रयत्न केला.



## महावितरणची क्रिकेट स्पर्धा रंगली

**नवी मुंबई : बातमीदार**

महावितरणच्या नेरूळ विभागातील शाखा अंतर्गत क्रिकेटची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी करण्यासाठी घेण्यात आलेल्या या स्पर्धेत एकूण १० संघ सहभागी झाले होते.

नेरूळ विभागातील प्रत्येक शाखा कार्यालयाने आपला संघ स्पर्धेत उतरवला होता. या स्पर्धेचे उद्घाटन भांडूप परिमंडळाचे मुख्य अभियंता गणेशकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षपद नेरूळ विभागाचे कार्यकारी अभियंता सिंहाजीराव गायकवाड यांनी भूषविले. स्पर्धेसाठी शशिकांत म्हात्रे व त्यांचे सहकारी कामगारांनी विशेष पुढाकार घेतला.

### कनिष्ठ जागतिक वेटलिफ्टिंग स्पर्धा

## पुण्याच्या हर्षदाला सुवर्णपदक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पुण्याच्या हर्षदा गरूडने ग्रीसमध्ये झालेल्या कनिष्ठ जागतिक वेटलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत ऐतिहासिक सुवर्णपदकाची कमाई केली. या स्पर्धेत सुवर्ण कामगिरी करणारी ती पहिली भारतीय वेटलिफ्टिंगपटू ठरली आहे.



हर्षदाने ४५ किलो वजनी गटात स्नॅचमध्ये ७० किलो, तर क्लिन आणि जर्कमध्ये ८३ किलो असे एकूण १५३ किलोचे वजन उचलत अग्रस्थान पटकावले. तिने विशेषतः स्नॅचमध्ये फेरीगणिक आपली कामगिरी उंचावत ६४ किलो, ६७ किलो आणि नंतर ७० किलो वजनाची नोंद केली तसेच तिने आपले तिन्ही क्लिन आणि जर्क प्रयत्न यशस्वीपणे पूर्ण करताना सर्वोत्तम ८३ किलोची नोंद केली.

या गटात टर्कीच्या बेक्तास कांसूने एकूण १५० किलो (६५ किलो आणि ८५ किलो) वजनासह रौप्य, तर माल्डोव्हाच्या हिन्कू तियोडोरा-लुमिनिताने एकूण १४९ किलो (६७ किलो आणि ८२ किलो) वजनासह कांस्यपदक मिळवले. भारताच्या अंजली पटेलला (एकूण १४८ किलो) पाचव्या स्थानावर समाधान मानावे लागले.

१८ वर्षीय हर्षदाने यापूर्वी खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत जेतेपद मिळवले असून तिने २०२०मध्ये आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत १३९ किलो वजन उचलत कांस्यपदक मिळवले होते.

## पंचांच्या चुकीच्या निर्णयाचा मला फटका -सिंधू

**मनिला : वृत्तसंस्था**

भारताची तारांकित बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधूला आशिया अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. उपांत्य फेरीत जपानच्या अकाने यामागुचीविरुद्धच्या लढतीदरम्यान पंचांच्या चुकीच्या निर्णयाचा मला फटका बसला आणि माझा अंतिम फेरीत खेळण्याचा हक्क हिरावून घेतला गेला, अशी भावना सिंधूने व्यक्त केली आहे. या वेळी सिंधूचे डोळेही पाणावले.

उपांत्य फेरीत सिंधूला यामागुचीकडून २१-१३, १९-२१, १६-२१ असा पराभव पत्करावा लागला. पहिला गेम जिंकल्यानंतर दुसऱ्या गेममध्ये सिंधू १४-११ अशी आघाडीवर होती. त्यावेळी सर्व्हिस करण्यापूर्वी तिने बराच वेळ घेतल्याने पंचांनी दंडस्वरूपात प्रतिस्पर्धी यामागुचीला एक गुण बहाल केला. यानंतर सिंधूची लय बिघडली. तिने दुसरा गेम १९-२१ असा अवघ्या दोन गुणांच्या फरकाने गमावला. त्यानंतर तिसऱ्या गेममध्येही तिला पुनरागमन करता आले नाही. त्यामुळे सिंधूला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.



> मी सर्व्हिसपूर्वी बराच वेळ घेत असल्याचे पंचांनी मला सांगितले, मात्र प्रत्यक्षात प्रतिस्पर्धी खेळाडू त्यावेळी पूर्णपणे तयार नव्हती. असे असतानाही पंचांनी अचानक तिला एक गुण बहाल केला आणि ही गोष्ट अनुचित होती. माझ्या पराभवामागे हेसुद्धा एक कारण होते.
>
> **-पी. व्ही. सिंधू**

## नागपूरची बुद्धिबळपटू दिव्या भारतीय संघात

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आगामी ऑलिम्पियाड बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या आणि महिला विभागात प्रत्येकी दोन संघ यजमान भारताचे प्रतिनिधित्व करणार असून या संघांची सोमवारी (दि. ३) घोषणा करण्यात आली. महिला संघामध्ये नागपूरची महिला ग्रँडमास्टर दिव्या देशमुखचाही समावेश करण्यात आला आहे.

पाच वेळचा विश्वविजेता बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद या स्पर्धेमध्ये भारतीय संघांच्या प्रेरकाच्या भूमिकेत दिसेल. ही स्पर्धा चेन्नईमध्ये २८ जुलै ते १० ऑगस्ट या कालावधीत रंगणार आहे. खुल्या विभागातील दोन्ही संघांमध्ये केवळ ग्रँडमास्टर खेळाडूंचा समावेश आहे. २०२०च्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या भारतीय संघाचा कर्णधार विदित गुजरातीची खुल्या गटातील पहिल्या संघात निवड झाली आहे. महिला विभागातील पहिल्या भारतीय संघामध्ये कोनेरू हम्पी आणि जागतिक क्रमवारीत १०व्या स्थानी असणारी द्रोणावल्ली हरिका या तारांकित खेळाडूंचा समावेश आहे.

## धोनीने पुढच्या वर्षी चेन्नईकडून खेळण्याबाबत स्पष्ट केली भूमिका

**पुणे : प्रतिनिधी**

महेंद्रसिंह धोनी आयपीएलमध्ये कर्णधार म्हणून परतला आहे. चार वेळा आयपीएल विजेता कर्णधार धोनीने तो पुढील वर्षी आयपीएल खेळणार की, नाही हे सांगितले आहे.

धोनी रविवारी जेव्हा नाणेफेकसाठी आला तेव्हा मॉरिसनने त्याला विचारले की, तो भविष्यात यलो जर्सी म्हणजेच चेन्नई सुपर किंग्जकडून खेळताना दिसणार आहे का? यावर धोनीने उत्तर देताना म्हटले की, पुढच्या वर्षी म्हणजे २०२३मध्येही तुम्ही मला पिवळ्या जर्सीत पहाल, पण ही जर्सी कोणती असेल हे येणारा काळच सांगेल. यामुळे धोनी पुढच्या वर्षीदेखील आयपीएलमध्ये चेन्नईच्या संघासोबत असणार हे स्पष्ट झाले आहे, पण तो कोणत्या भूमिकेत असेल हे मात्र त्याने सांगितलेले नाही.



सामन्यानंतर धोनीने रवींद्र जडेजाचे कर्णधारपद सोडल्याबाबतही भाष्य केले. मला वाटते जडेजाला गेल्या मोसमातच माहित होते की तो या वर्षी कर्णधार होणार आहे. पहिल्या दोन सामन्यांमध्ये मी त्याचे कर्णधारपद पाहिले आणि नंतर त्याला त्यांच्या मर्जीने जबाबदारी बजावू दिली. मला वाटते की, कर्णधारपदाचा त्याच्या तयारीवर आणि खेळावर परिणाम होत होता. त्याचा परिणाम त्याच्या फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणावरही दिसून आला, असे धोनी म्हणाला.

## एशियाडमधील भारताच्या सहभागाचा निर्णय आढाव्यानंतरच -क्रीडामंत्री

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

यंदा आशियाई क्रीडा स्पर्धेचे आयोजन करणाऱ्या चीनमधील शांघाय आणि बीजिंग या शहरांमध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव पुन्हा वाढताना दिसतो आहे. त्यामुळे आशियाई स्पर्धेपुढे संकट उभे ठाकले असून या स्पर्धेतील भारताच्या सहभागाबाबतचा निर्णय यजमान राष्ट्राशी चर्चा करून लवकरच घेतला जाईल, अशी माहिती केंद्रीय क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांनी दिली.



चीनमधील प्रमुख आर्थिक केंद्र असलेल्या शांघाय शहरामध्ये महिनाभरापासून टाळेबंदी लावण्यात आली असून राजधानी बीजिंगमध्येही निर्बंध अधिक कठोर करण्यात येत आहेत. त्यामुळे चीनमधील हांगजो येथे १० ते २५ सप्टेंबर या कालावधीत होणारी आशियाई क्रीडा स्पर्धा पुढे ढकलण्याबाबतही आयोजक विचार करत असल्याचे म्हटले जात आहे, मात्र यजमानांनी संपूर्ण माहिती देत हा गोंधळ दूर केला पाहिजे, असे क्रीडामंत्री ठाकूर यांचे म्हणणे आहे.

'चीनमधील सध्याची परिस्थिती त्यांच्याकडूनच जाणून घेणे गरजेचे आहे. आशियाई स्पर्धेत सहभागी होणाऱ्या अन्य राष्ट्रांमध्ये चर्चा सुरू आहे. भारतसुद्धा या स्पर्धेतील सहभागाबाबतचा अंतिम निर्णय लवकरच घेईल, मात्र त्यापूर्वी यजमान राष्ट्राने तेथील परिस्थितीचा आणि त्यांच्या योजनांचा तसेच ते या स्पर्धेच्या सुरक्षित आयोजनासाठी कशी तयारी करीत आहेत याबाबतची माहिती देणे आवश्यक आहे,'असे क्रीडामंत्री ठाकूर यांनी म्हटले.

### कोरोना महामारीने डोके वर काढले

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेल्या दोन वर्षांत चीनमधील अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धा रद्द कराव्या लागल्या, तर या वर्षी बीजिंग हिवाळी ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिक स्पर्धेचे आयोजन कोरोनाचे सर्व नियम काटेकोरपणे पाळून करण्यात आले. या दोन्ही स्पर्धा प्रेक्षकांविनाच झाल्या. आता कोरोनाने पुन्हा डोके वर काढल्याने आशियाई क्रीडा स्पर्धेबाबतही साशंकता निर्माण झाली आहे.

## हैदराबादचा वॉशिंग्टन सुंदर पुन्हा जखमी

**मुंबई : प्रतिनिधी**

यंदाच्या आयपीएल हंगामात खेळादरम्यान अनेक खेळाडू जखमी होत आहेत. सनरायझर्स हैदराबादचा गोलंदाज वॉशिंग्टन सुंदरदेखील पुन्हा एकदा जखमी झाला आहे.

हैदराबादचा अष्टपैलू खेळाडू वॉशिंग्टन सुंदर दुखापतीमुळे सुरुवातीचे तीन सामने खेळू शकला नव्हता. त्यानंतर गुजरात टायटन्सविरोधातील सामन्यात त्याने या हंगामातील पहिला सामना खेळला, मात्र रविवारी चेन्नई सुपर किंग्जविरोधात खेळताना क्षेत्ररक्षण करताना त्याच्या हाताला जखम झाली. विशेष म्हणजे तो ज्या हाताने गोलंदाजी करतो त्याच हाताला दुखापत झाल्यामुळे तो आगामी सामने खेळण्याविषयी शंका उपस्थित केली जात आहे.






## फुटबॉल स्पर्धेत आर्सेनल, टॉटनहॅम संघ विजयी

**लंडन : वृत्तसंस्था**

आर्सेनल आणि टॉटनहॅम या संघांनी प्रीमियर लीग फुटबॉलमधील आपले सामने जिंकत पुढील हंगामातील चॅम्पियन्स लीगच्या पात्रतेसाठी दावेदारी भक्कम केली आहे.



आर्सेनलने रॉब होल्डिंग (३८वे मि.) आणि गॅब्रिएल (५४वे मि.) यांच्या गोलमुळे वेस्ट हॅमला २-१ असे पराभूत करत गुणतालिकेतील आपले चौथे स्थान कायम ठेवले. दुसरीकडे, टॉटनहॅमने आघाडीपटू सॉन ह्युंग-मिनचे (६० आणि ७९वे मि.) दोन गोल आणि हॅरी केनच्या (२२वे मि.) एका गोलच्या जोरावर लिस्टर सिटीला ३-१ अशा फरकाने नमवले. या निकालांनंतर चौथ्या स्थानावरील आर्सेनलचे ३४ सामन्यांत ६३ गुण झाले असून पाचव्या स्थानावरील टॉटनहॅमच्या खात्यावर ३४ सामन्यांत ६१ गुण आहेत. हंगामाअंती गुणतालिकेतील अव्वल चार संघ पुढील हंगामाच्या चॅम्पियन्स लीगमध्ये खेळण्यास पात्र ठरतील.








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com